॥ श्री ॥

# प्रौढविधवाविवाह नाटक.

अंक १-५.

विजय छापखाना, गिरगांव-मुंबई.

किंमत ८ आणे.

॥ श्री ॥

# प्रौढ विधवा विवाह नाटक

(अंक १ ते ५)

लेखक व प्रकाशक

**लक्ष्मण गोपाळ देशमुख,**

बी. ए., रि. स्टॉ. सी. एस.,

सोमणबिल्डिंग, गिरगांव मुंबई.

शके १८३२. ] आवृत्ति १ ली. प्रती ५००. [ सन १९१०.

किंमत ८ आणे.

( प्रथम पृष्ठें ६ व शेवटील पृष्ठें ८५ ते ८८,
केशव पुरुषोत्तम मेहेंदळे यांनीं आपले मुंबई–कांदेवाडी
निकदवरी लेन मधील "श्रीलक्ष्मीनारायण" प्रेसमध्यें छापिलीं. )

( पृष्ठें १ ते ८४, गणेश नारायण जोशी यांनीं आपले
मुंबई–गिरगांव मधील "विजय" प्रेसमध्यें छापिलीं. )

# प्रस्तावना.

नवीन पुस्तक लिहिण्यास मुख्य कारण पाहिलें असतां, आपले विचार लोकांस कळवावेत आणि तसें झाल्यानें आपल्या मताचे लोक अधिक होऊन समाजाची स्थिति सुधारावी अगर सुधारण्यास मदत तरी व्हावी हेंच दिसतें. बाकी सर्व कारणें प्राय: गौण समजावीं लागतील. प्रस्तुत नाटकांत मुद्दाम प्रौढ विधवा विवाहाचा प्रश्न घातला आहे. कारण कोणत्याही सबबीनें ह्मणा, यास नेहमीं मागें ढकलण्यांत येत असतें आणि तसें झाल्यानें मुख्य प्रश्न फक्त अंशत: सोडविण्यांत येतो. तसें होणें हितावह, न्याय्य किंवा प्रामाणिकपणाचें नाहीं यास्तव ग्रामाध्यक्ष आणि धर्माध्यक्ष यांची गैरमर्जी होण्याचा संभव आहे, तरी या प्रश्नाचें वगळलें जाणारें रूप या नाटकांत दर्शविण्यांत आलें आहे. आणि ग्रंथकारास आशा आहे कीं प्रश्नाचें खरें स्वरूप या योगें लोकांस समजेल मग हट्टीपणानें अगर निरवकाशानें हेळसांड करणें ज्यांस युक्त दिसत असेल ते तशी करोत त्यास इलाज नाहीं. रंगभूमीवर जेव्हां हें नाटक एखादी मंडळी करून दाखवील तेव्हां वाचनापेक्षांही जास्त उलगडा मुख्य प्रश्नाचा होणार आहे. परंतु त्या उद्योगास ग्रंथकारास लागण्याची तूर्तच गरज दिसत नाहीं. कांहीं दिवस गेले ह्मणजे झालेली रचना लोकांस आणि नाटककार मंडळीस कितपत आवडते हें दिसून येईल, नंतर विचार करण्यांत येईल.

संगीत बहुत लोकांस आवडतें व कांहीं रस कवितेनें जसे खुलतात तसे साध्या भाषणानें खुलत नाहींत ह्मणून योग्य स्थळीं संगीताची योजना केली आहे व ती इतकी माफक आहे कीं भाषणाची अगर वादाची गोडी ती बिघडवीत नाहीं.

विधवा विवाह सशास्त्र ठरविण्याची एका काळीं किती खटपट जहाली होती याची माहिती असणारे मनुष्य हल्लीं बहुत करून फार सांपडावयाचे नाहींत. मग प्रत्यक्ष झालेला वाद पहाणारे मनुष्य फार कोठून सांपडणार! या साठीं सन १८७० सालीं झालेले प्रयत्न व त्याचा निष्कर्ष आणि नंतर सुमारें वीस वर्षांनी एका विद्वान पदवी धरांनीं केलेल्या विचारांतील मुद्दे हीं वाचकांस नाटकांतील भाषणांत कळविण्यात आलीं आहेत. त्यावेळीं जे प्रयत्न झाले ते पुनर्विवाहाचा प्रश्न अंशतः सोडविण्याचे झाले नाहींत. कोणी लोक हीच त्यावेळची झालेली चूक असें समजतात व अंशतः ह्मणजे बालविधवाविवाहापुरती मोकळीक त्यावेळेस मिळाली असती तर समाजाचें बहुत हित झालें असतें असें समजतात व ही कल्पना पुष्कळ लोकांस खरी वाटते, प्रस्तुत नाटककारांच्या मतें ही चुकीची व हिताची कल्पना फारशी आधारभूत नाहीं. या विषयीं विशेष वाटाघाट करणें नाटकाचे प्रस्तावनेस शोभण्यासारखें नाहीं. इतकें सांगणें पुरे आहे कीं, प्रयत्न केव्हांही करणें तें प्रश्नाचें पूर्ण स्वरूप ओळखून करणें हें चांगलें. गुरफटलेले अथवा-अर्धवट प्रयत्न करणें हें कदाचित् मुत्सद्दीपणाचें असेल परंतु प्रामाणिकपणाचें अगर धैर्याचें खास काम नव्हे.

मुंबई, ता. २५–१२–१९१०. ग्रंथकार.

# प्रौढ विधवाविवाह नाटक.

## नाटकांतील पात्रांची यादी.

| | |
|---|---|
| चंद्रशेखर ( एक वकील ) | नायक. |
| सगुणाबाई | नायिका. |
| नारायणराव ऊर्फ रावसाहेब | सगुणाबाईचा सासरा. |
| यमुनाबाई | रावसाहेबांची पत्नी. |
| वासुदेव | सगुणाबाईचा मुलगा. |
| नाना | रावसाहेबांचा मुलगा. |
| सुंदराबाई | नानाची बायको. |
| त्रिंबक | नानाचा मित्र. |
| आनंदीबाई | सगुणाबाईची मैत्रीण. |
| बाबासाहेब | रावसाहेबांचा मित्र. |
| निळकंठस्वामी | रावसाहेबांचे बंधु. |
| अक्कासाहेब ( शारदाबाई ) | सगुणाबाईची बहीण. |
| गुंडोपंत | शारदाबाईचे यजमान. |
| जांबुवंत | चंद्रशेखराचा स्नेही. |
| एक पेन्शनर<br>बाळासाहेब सरदार | पुनर्विवाहाविरुद्ध दोन गृहस्थ. |
| रामभटजी | विरुद्धपक्षाचे भिक्षुक. |
| जानकीबाई | रामभटजींचें कुटुंब. |

| | |
|---|---|
| कृष्णराव | रामभटजींचा मुलगा. |
| कमळजाबाई | रावसाहेबांची ठेवलेली बाई. |
| मैनाबाई | सुईण. |
| फौजदार | |
| सावळाराम | रामभटजींच्या नादानें आपली मुलगी देणारे एक गृहस्थ. |
| अप्पाशास्त्री<br>गोविंदराव (गोसावी)<br>बाळंभट<br>चिंतोपंत | चंद्रशेखराच्या बाजूचे. |

यांशिवाय रामा, जानू, रावजी वगैरे गडी; बालु, कालु, मासे धरणारीं पोरें, वामनराव, (कारकून) बोलावणेकरी इ. इ.

॥ श्री ॥

# प्रौढविधवाविवाह नाटक.

## अंक १ ला.

### प्रवेश १ ला.

स्थळ–नानाचें मंदीर.

( नाना बसलेला आणि त्याचा सोबती त्रिंबक त्याचेजवळ बसलेला असे पडदा उघडल्याबरोबर दिसतात. )

**त्रिंबक**–आपली मुद्रा जरा विचारांत गढल्यासारखी दिसते नानासाहेब; कारण विचारावं कीं नाहीं, याचा मी विचार करीत होतों, पण तर्क चालेना; ह्मणून स्पष्ट आपल्या जवळ बोललों.

**नाना**–अरे, माझ्या मनांत ह्या माझे धाकटे भावजयीचा कोठें तरी पुनः विवाह करावा असें होतें; हें तुला ठाऊक नाहीं का? तिला जरी दोन तीन वर्षांचें मूल आहे, तरी पुढील सर्व आयुष्य तिनें याच स्थितींत काढावें हें मला बरोबर दिसत नव्हतें. माझ्या एका मित्राचें आज पत्र आलें. त्याची बायको निवर्तल्यास दोन वर्षें जाहलीं; त्याचा निश्चय लग्न न करण्याचा होता, पण

तो सुटला आहे. वहिनीला पाहूनच सुटला; तेव्हां हा सुयोग जुळला आहे खरा, परंतु वडील मातुश्री यांस ही गोष्ट कळवावी कशी? त्यांचा रुकार पडतो कीं नाहीं या साठीं विचारांत आहें कीं करावें कसें?

**त्रिंबक**–मित्र कोण? त्यांचे दृष्टिस पडण्याचा योग आला कोठें?

वडील मातुश्रीचा रुकार पडणें कठीण तर खरें, परंतु स्थलांतर केलें ह्मणजे झालें.

**नाना**–मित्र आमचा वकील चंद्रशेखर. वहीनी गेली होती भेटण्यास आपल्या बहिणीला. तिचा नवरा गुण्डोपंत आणि चंद्रशेखर हे परम स्नेही एकाच गांवीं राहातात; मग दृष्टीस पडण्याचें कठीण काय? स्थलांतर करण्याची कल्पना मलाही पसंत पडते, वडील मातुश्री जरी विरुद्ध नाहींत तरीं स्वतः अंगावर घेऊन करण्याचा त्यांचा मानस नाहीं. उघड आहे कीं, लोकरीतिविरुद्ध घरच्या मुख्य मनुष्यास कांहीं करितां येत नसतें, आपल्या स्वतःसाठीं ते भितात अशी गोष्ट मुळींच नाहीं, परंतु त्यांच्यावर अवलंबून पुष्कळ मनुष्यें असतात त्यांचा त्यांस विचार करावा लागतो; आज अमक्या मुलाचें कार्य, उद्यां तमक्याचें कार्य, लोकव्यवहाराप्रमाणें कांहींतरी केलेंच पाहिजे, नांवें ठेविलीं तरी मुख्याला; चांगलें ह्मटलें तरी मुख्याला. लोकरीति सोडून मुख्य मनुष्यास भागत नाहीं. यासाठीं त्याच्या दृष्टीआड इतर ठिकाणीं घेऊन जावें हें—

**त्रिंबक**—प्रशस्त प्रशस्त. पण वकिलांचें वय किती? वहिनीचा मानस काय आहे? नाहींतर आपलें आगींतून निघालें आणि फुंपाट्यांत पडलें तसें न व्हावें.

**नाना**—वकिलांचें वय सुमारें ४०. वहिनीला त्यांचें पत्र आल्याचें कळल्यापासून तिला बोललेलें देखील चटदिशीं लक्षांत येईनासें झालें आहे. वृत्ति उत्कण्ठित होऊन चंचल झाल्यासारखी दिसते; बाकी बायका कांहीं उघड सांगत असतात का? तर्कानें जाणावें लागतें. पुरुषाला जशी धंदा लागला ह्मणजे हुशारी येते, पाऊल लवकर उचलतें, भूक कमी होते, तशीच स्थिती बायकांला नवरा मिळतो असें समजलें ह्मणजे होते. तथापि तिची मैत्रीण वडील जाऊ यांच्यामार्फत आणखीं कांहीं प्रसंगानंतर खात्री झाली ह्मणजे वहिणीकडे तिला पाठवावी असें वाटतें. ह्मणजे चंद्रशेखर पुढील व्यवस्था करणार आहे. त्याला मुलगाही नाहीं. हिचा मुलगा मोठा होईपावेतों तो सांभाळणार आहे. मग वाईट काय?

**त्रिंबक**—काय, काय, कांहीं नाहीं. चांगलें तें चांगलेंच.

**नाना**—बरें तर मी कांहीं तरी प्रसंग येईल, आणि जास्त खुलासा होईल अशी योजना पाहातों, तूं एक दोन दिवसांनीं फिरून ये.

**त्रिंबक**—येतो तर लोभ असावा. (निघून जातो.)

**नाना**—(मनाशीं) 'पंचस्वापत्सुनारीणां। पतिरन्यो विधीयते॥' पैकीं एक 'मृते पतौ' असा शास्त्रमार्ग असतां

स्वाभाविक वयोधर्माविरुद्ध स्त्रियांना ठेवण्याविषयीं ब्राह्मण समाजांतच इतका आग्रह कां हें समजत नाहीं. मला तर एकही कारण सयुक्तिक दिसत नाहीं.

( इतक्यांत सुंदराबाई दुसरे बाजूनें आंत येते. )

**नाना**–( सुंदराबाईकडे पाहून ) कशी काय आहे वहिनीची तब्येत ?

**सुंदराबाई**–आशारूप पल्लव फुटलेला कुठें झांकतो का ? त्यांत बाई स्पष्ट मनाच्या, वय लहान, अजून दंभ ह्मणजे काय तें ठाऊक नाहीं, त्याना नारायण देखील अधीक प्रीय झाला आहे. एक कीं दोन अनेक गोष्टीवरून मला वाटतें कीं, त्यांनां पत्रांतील मजकुरावरून खरोखर मोठी खुशाली झाली आहे.

**नाना**–असें आहे तर मला समक्ष कांहीं ऐकूं येईल असा योग आला तर वहिनीला एकदम चंद्रशेखराच्या गांवीं पाठवितों, मग तेथें सर्व कांहीं जुळून येईल.

**सुंदराबाई**–बरें आहे, ही मी बाईच्याकडे जातें, तेथें त्यांची मैत्रीण बसलीच आहे, तेथें एक दोन गोष्टी बोलतें; ह्मणजे त्यांचे उत्तरांत आपणास समजून येईल. आपण बाहेर उभे राहावें, ही मी जातें.

( असें बोलून निघून जाते. )

---

## प्रवेश २ रा.

### स्थळ-सगुणाबाईची खोली.

(सगुणाबाई मुलास खेळवीत आहे व तिची मैत्रीण आनंदीबाई जवळ बसली आहे.)

**सगुणाबाई**–किती तरी या मुलाला आटपून आटपून धरावा; वडिलांचा आवडता, आजोबांचा आवडता आणि माझें देखील आवडतें बाळ. (नारायणाचे हनुवटीला हात लावून) खेळाला कांहीं तोटा नाहीं, खोड्यांला कांहीं तोटा नाहीं, बरी आपली मला वेळ घालवावयाला तजवीज आहे.

**आनंदीबाई**–अहो मुलें जर निवांत बसतीं तर मग त्यांचें कौतूक तें काय वाटलें असतें; पण खरें काहो, मी आपली गोष्ट ऐकिली ती विचारतें. कोणी एका वकिलानीं द्वितीय विवाहाचें आपल्याबद्दल मागणें केलें आहे. हें खरें काहो?

**सगुणाबाई**–होय, जसें तूं ऐकिलें आहेस तसें मीही ऐकिलें आहे. पण हाताच्या आणि तोंडाच्यामध्यें देखील पुष्कळ संकटे असतात मजल पार पडेल तेव्हां खरी.

(नाना खोली बाहेर एका बाजूस उभा राहातो आणि सुंदराबाई दुसरीकडे उभी राहून दोघे दोहोंकडून ऐकतात.)

**सगुणाबाई**—आधींच सुखाच्या गोष्टी काढून पुढें दुःखी होण्यापेक्षां प्रथमच जरा सावकाशपणा ठेविला असतां चांगलें.

**आनंदीबाई**—चांगलें, चांगलें. खऱ्या गोष्टीला नाहीं कसें ह्मणावें ? त्यांतून तुमच्यासारख्या विचारी बायकोला कोण शहाणपण शिकवायला हवें ?

**नाना**—( आपल्याशीं ) खरेंच, सगुणा वहीनी नांवाप्रमाणें आहे खरी. वय लहान पण शहाणपण मोठें. बरें पुढें ऐकूं. येथें कांहीं एकदम आपणाला कोणी पाहणार नाहीं; वेळही किंचित् अंधेरी रात्र झाली आहे.

**सुंदराबाई**—( स्वगत ) माझा तर्क कांहीं चुकलेला नाहीं.

**सगुणाबाई**—माझ्या नजरेस तर ती सतेज आणि शांत मुद्रा आवडली याचें नवल काय? परंतु त्यांना माझें अमंगल रूप कसें आवडलें याचें मला फार नवल वाटतें! मागणीचें उत्तर भाऊजीनीं काय पाठविलें तें समजत नाहीं, सुंदराबाईनीं काय कळविलें तेंही समजलें नाहीं.

**नाना**—( स्वगत ) आतां येथें जास्त उभें राहण्याचें प्रयोजन नाहीं. वहिनी तुझ्या मनाप्रमाणेंच उत्तर पाठवितों तूं काळजी करूं नकोस; बाकी गोष्टी परमेश्वराच्या आधीन. ( निघून जातो. )

**सुंदराबाई**—( स्वगत ) जाहली खात्री तिकडली, आतां आपण आंत जावें. ( खोलींत जाते. ) का, नारायणा,

काय करतो आहेस? बाई काय चाललें आहें? आनंदीबाई असल्यावर मग काय कर्मणुकीला कमी!

**नारायण**—काकू हा घोडा चालत नाहीं.

**सुंदराबाई**—आपण त्याला खालीं चाकें लावूं ह्मणजे चालेल.

**आनंदीबाई**—वकिलांचें कायसें पत्र आलें आहे, त्याचें उत्तर काय पाठविलें एजमानांनीं?

**सुंदराबाई**—उत्तर जाऊबाईची मर्जी पाहून लिहिणार होते. मुलींच्या पहिल्या विवाहांत तर त्यांची मर्जी कोणी पाहत नाहींत. परंतु द्वितीय विवाह आहे लोकापवादग्रस्त. सासुबाई, मामंजी हे कांहीं या कामाला आपण होऊन पुढें पडणार नाहींत, त्रास पडणार ज्याचा त्याला; ह्मणून विचारानें गोष्ट करणें बरें असें त्यांचें मत होतें.

**आनंदीबाई**—ज्याचे त्याला बोलण्यास जरा संकोच होतो, आपल्याला पाहिजे तशी खात्री मी करते; जाऊबाईची कांहीं हरकत नाहीं.

**सुंदराबाई**—बरें आहे, मला तसें वाटलेंच होतें, परंतु अशा कामांत संशयावांचून काम जाहलेलें चांगलें. संशय लग्नाचे इच्छेचा नव्हे, लग्न विषयक पात्रांचे परस्पर प्रीतीचा. बरें, एकीकडून पत्रानें निवृत्ती झालीच होती, दुसरीकडून जाहली म्हणजे आतां लागणें फक्त पुढील मार्गास.

आनंदीबाई—माझ्याजोगतें कांहीं काम असलें तर माझी आठवण ठेवा. मला एकदां माझ्या मैत्रिणीचें सौभाग्य कुंकू केव्हां पाहीन असें जाहलें आहे. शास्त्र करणाऱ्याला काय मेल्यांला! आपल्याला जी अडचण वाटेल त्याचें नांव दुःख. तें दूर करण्याला उपाय करावयाचा; त्याचें नांव न्याय, तेंच दुःख दुसऱ्याला जाहालें असतां त्याचें निवारण्यासाठीं उपाय न करूं देणें याचें नांव अन्याय नाहीं तर काय? बरें अगदीं दगडाला पाझर फुटलाच तर अनुपभुक्त विधवा मात्र द्वितीय विवाहास कित्येकांस ग्राह्य दिसतात; सरसकट ग्राह्यता दिसणारे असे धन्य पुरुष थोडे. पुरुषांची चाकरी जर एके ठिकाणची गेली, तर दहा ठिकाणीं पुनः लागावी अशी त्यांची इच्छा असते, जमीन दर वर्षांनीं नांगरली तरी चालते, दहा जणाच्या हातांत गेली तरी कोणी टाकीत नाहीं, इतर सर्व माल मिळकत दहा जणाकडे फिरली तरी कोणी टाकीत नाहीं, बायकांचा अपराध पाहिला तर विशेष कोणताही दिसत नाहीं. एक तर अपराधावांचून अनादर किंवा भ्रांति यांपैकीं कोणचा तरी एक दुष्ट ग्रह बायकांच्या छळणुकीला ब्राह्मण व त्यांचा कित्ता गिरविणार जातींतच उत्पन्न झाल्यासारखा दिसतो. त्याच्या मगरमिठींतून माझी मैत्रीण सुटण्याचा रंग दिसत आहे. परमेश्वर करो आणि सनाथ झालेली माझे लवकर दृष्टीस पडो.

**सुंदराबाई**—उत्तर पाठविण्याची मी लककर तजवीज करविते. तुह्मी ह्मणतां तसें घडून येण्यास फार दिवस न लागावेत असें मला देखील वाटतें.

**वासुदेव**—काकू माझ्या घोड्याचीं चाकें कधीं लावणार ?

**सुंदराबाई**—सुतार आला ह्मणजे लावूं बरें.

**वासुदेव**—सुतार कशाला येईल त्याला चाकाचीं गरज आहे काय ?

**सुंदराबाई**—नाहीं, मला आहे व मी बोलावतें त्याला बरें.

**सगुणाबाई**—बाळ किती तुला घाई ? इतक्यांत झट-लेस तों इतक्यांत काकूनें चाकें द्यावीं कुठलीं ? सुतार आणावा कुठला ? सुतार येईल मग होतील चाकें.

**सुंदराबाई**—मी जाते हो बाई, मग येईन. चाकें कर-वितें बरें बाळ. ( निघून जातें. )

**आनंदीबाई**—मला मिळेल का परवानगी घरीं जाण्याला ? माझ्या जोगतें काम असेल तर सांगा. ( निघून जाते. )

---

## प्रवेश ३ रा.

**स्थळ-रावसाहेबांचा दिवाणखाना.**

**( रावसाहेब कागदपत्र पहात बसलेले व गडी रामा बाहेर बसलेला दिसतो. )**

**रामा**—( आंत येऊन ) आपनाकडे बाबासाहेब आले हएत.

**रावसाहेब**—येऊंदे त्यांना इकडे.

**बाबासाहेब**—मला गावांत समजलें कीं, आपल्या येथें पुनर्विवाहाची कांहीं गोष्ट घाटत आहे.

**रावसाहेब**—अहो, पुनर्विवाह कोणाचा करितां? बायकांचा कीं पुरुषांचा? पुरुषांच्याबद्दल तर कोठें योग्य सबब असल्यावर आडकाठी नाहींच. बायकांविषयीं कोठें कोणी विचार करीत नाहीं, मग आपल्याला समजलें तें काय? आमच्या येथें तर कांहीं सबब दिसत नाहीं.

**बाबासाहेब**—मी ऐकिलें आहे तें आपल्या विधवा सुनबाईबद्दल. कोणी वकील मध्यवयाचे विवाहास तयार झाल्याचें ऐकिलें. आणि त्यांनां कायसा रुकारही लिहून गेला आहे ह्मणून ह्मटलें आपल्याला ठाऊक असेल.

**रावसाहेब**—अहो अशी गोष्ट आमचे येथें कधींच घडावयाची नाहीं. बोलणाराला काय? त्याचें तोंड धरावें कोणीं! तुह्माला पाहिजेतर लिहून ठेवा कीं, अशी गोष्ट आमच्या येथें कधीं घडावयाची नाहीं.

**बाबासाहेब**—घडली ह्मणून कांहीं नवल नाहीं. पण आपल्या येथेंच नको. मी कांहीं शास्त्री पुराणीक नव्हे मला कळतें काय आणि माझ्या हातीं काय? बरीवाईट गोष्ट कानावर आली ती वेळेवर कळविली ह्मणजे स्नेह्याचें अर्धें काम झालें. पुढें जसें विचारास येईल तसें आपण करतांच आहां.

**रावसाहेब**—माझा जर अभिप्राय ह्मणाल, तर मी कांहीं विधवेच्या विवाहाविरुद्ध आहें, असें मुळींच नाहीं. त्यांतून ज्या लोकांत बालविवाहाची चाल आहे, तेथें या गोष्टीला निषिद्ध मानणें ह्मणजे तर महा अन्याय. प्राचीन शास्त्रकारांची संमति या कामाला पूर्ण आहे. आधुनिक शास्त्रकारांनीं जसें नौकायान, सोमपान, विद्यादान, परभाषाज्ञान, व मांसाहार बंद केले तसेच विधवाविवाह बंद केले. त्यांच्या मतानें सहगमन, केशवपन, जात्यभिमान, उपोषण, तीर्थाटण, नामस्मरण, यांचें साम्राज्य व्हावें. परंतु अन्यायाचे आणि आळशीपणाचे मार्ग आपण सुरू केले ह्मणजे, ते मोडण्यासाठीं दुसरे लोक येतात. परमेश्वराला अन्याय, आळस, आणि वृथाभिमान हीं खपत नाहींत, असें बरेच वेळां दृष्टीस येतें. तसेंच त्याचें कर्तृत्व दृष्टीस येतें, तेव्हां आकुंचित दृष्टीनें लक्षांत येत नाहीं. विधवाविवाह बंद करण्याचा मार्ग हा एक आधुनिक अन्यायांपैकीं आहे, त्याला न्याय असा भासविण्याचा प्रयत्न पुष्कळ युक्तिप्रयुक्ती व उपहास यांणीं लोक करितात; परंतु अखेरीस अन्यायाला अन्याय ह्मटल्यावांचून मार्ग राहत नाहीं. आतां लोक रूढीला मान देऊन एखाद्यानें आपण होऊन पुढें पडून गोष्ट न करणें हें निराळें. माझा प्रकार त्यांतलाच आहे या करितां मी होऊन माझ्या येथें ही गोष्ट करणार नाहीं.

**बाबासाहेब**–आपण न केली ह्मणजे आपल्यावर अपवाद राहिला नाहीं मग दुसरें कोणी का करीना? त्यांत आपल्याकडे दोष कोणता?

**रावसाहेब**–विधवाविवाहासंबंधानें आक्षेपकांची हकीकत मी एका पद्यांत घातली आहे; पाहिजे तर आपल्यास ह्मणून दाखवितों.

**बाबासाहेब**–फार उत्तम. पद्यासारखी मौज नुसत्या भाषणांत नाहींतरी कोठें आहे?

**रावसाहेब**–

## पद.

देती दोष बहुत विधवेला ।
परी त्यांतुनी खरा न एकही मना असा आला ॥ ध्रु० ।
जरि रोगानें पति मेलाऽऽ ह्मणती ईच्या दुर्भाग्यानें मृत्यु तया आलाऽऽ !
अपयश येई कोणालाऽ ह्मणती दर्शन विधवेचें हें आलेंऽ फळालाऽऽ ।
वर्ज्य ह्या मंगल कार्यालाऽ वस्त्राभरणें कुंकुम तैसे न मिळे ल्यायाला । ( न मिळती तैसे कुंकु कपाळाला )
मानिलया पतिसहगमनालाऽ योग्य त्यांतुनि सरकारानें सोडविलें यांला ।
यातना बहुतचि जीवाला ह्मणुनि त्रासुनी प्रवृत्त होती आत्मघाताला ।

अशा किती ह्मणून त्यांच्या हाल अपेष्टा सांगाव्यात. मनाला आणि जिव्हेला सांगणें देखील कंटाळवाणें होतें.

परंतु आमचा समाज असा पाषाणहृदयीं आणि दुरभिमानी आहे कीं, आपली चूक तर कबूल करण्याचें लांबच पण उलट चूक दाखविणाऱ्याचा तिरस्कार करण्याला मात्र तयार.

**बाबासाहेब**–होय. चूक कबूल करणें हें दुरभिमान आणि दुराग्रह आहेत तोंपर्यंत घडत नाहीं. मला आज्ञा होईल तर पुनः भेटेन.

**रावसाहेब**–बरें आहे, आपण यावें; नमस्कार.

(दोघे परस्परांस नमस्कार करितात व बाबासाहेब निघून जातात.)

**यमुनाबाई**–(हलक्या स्वरानें) रामा तिकडे कोण आहे?

**रामा**–(हलक्या स्वरानें) आतां बाबासाहेब आले होते, वाढूळ बसले व्हते; गेले. आपल्याला जावयाचें असेल तिकडे तर हरकत नाहीं.

**यमुनाबाई**–(आंत जाऊन रावसाहेबाकडे पाहून) बाबासाहेब काय ह्मणत होते? गाण्यांतील मजकूर विधवा स्त्रियांचे स्थितीबद्दल होता, तो किती जरी खरा असला तरी अविचारी समाजाच्या काय तो उपयोगी! त्यांचें तें खरें, बाकी खोटें; अशी आहे लोकस्थिती. आमच्या येथें नाहीं का एक उदाहरण! असून काय उपाय, कोणाचें हातीं आहे काय?

**रावसाहेब**–बाबासाहेब त्यासंबंधींच कांहीं ह्मणत होते, पण मला कांहीं ठाऊक नाहीं ह्मणून मी सांगि-

तलें. आपल्यायेथें कांहीं होत नाहीं जो करणार असेल त्यास विचारा.

**यमुनाबाई**—आपल्यायेथेंच जरी नसले तरी आपल्या येथील मनुष्याचेसंबंधाचेंच जर कार्य आहे, तर आपला अगदींच संबंध नाहीं असें समजून कसें होईल? नानाला कांहीं ठाऊक आहे असें वाटतें. त्याला विचारावें.

**रावसाहेब**—रामास सांगितलें ह्मणजे तो नानास बोलावील.

**यमुनाबाई**—रामा, जारे नानाला बोलाव असेल त्याचे जाग्यांत तर. (रामा जाऊन नानास बोलावून आणितो.)

(नाना आणि रामा येतात.)

**रावसाहेब**—आपल्या सगुणेच्याबद्दल का कोणी बोलणें लाविलें आहे? कोण इतका उदार मनाचा? किंवा उदारच कां ह्मणावा? मुलगी तशाच प्रकारची आहे. विधवा झाली ह्मणून तिचें स्वरूप गेलें की काय कोठें?

**नाना**—आपण ह्मणतां तेंच खरें. वहिनी गेली होती बहिणीकडे तेथें चंद्रशेखर ह्मणून कोणी वकील आहेत, त्यांनीं तिला पाहिलें. त्यांचा आणि बहिणीचे नवऱ्याचा स्नेह फार, ह्मणून तसा प्रसंग आला; त्यांनीं आपला हेतु मला दर्शविला. एकदम आपल्याकडे कसें लिहावें ह्मणून वहिनी कांहीं लग्नाच्या विरुद्ध नाहीं ही मी खात्री करून घेतली आहे.

**रावसाहेब**—विरुद्ध कशी असेल? तिचें कांहीं वय झालें आहे कीं काय? अरे २२ वर्षें ह्मणजे ही पहिले पतिसमागमाची वेळ आणि जरी किंचित् थोडीशी होऊन गेली ह्मणून समजलें, तरी काय? वाढ जोंपर्यंत चालू आहे तोंपर्यंत उत्तरोत्तर बहार वाढत जातो. पहिले वर्षीं आंब्याचे झाडाला १० फळें आलीं तर १० वें वर्षीं १०० पर्यंत जातें मान. ही झाली शेतकीची गोष्ट. व्यापाराची तशीच. पहिले वर्षीं कांहीं फायदा पडला नाहीं, तरी भरभराट होत जाईल तसतशी चालली किफायत वाढत. राज्याचें तसेंच; मराठी राज्य कां एकदम अटकेपर्यंत गेलें? शिवाजीनीं बीजारोपण केलें, बाजिरावांनीं वाढविलें. इंग्रजांचें तरी काय! क्लैवनें सुरुवात केली, माल्कम वेलस्ली यांनीं तें वाढविलें. वाढत्या वस्तूला कृत्रिम बंधनांनीं खुंटून टाकणें हें कृत्य आत्मघातकी लोकांवांचून घडावयाचें नाहीं. स्त्री व पुरुष या दोन शक्ति योग्य काळीं जुळूनच चालल्या पाहिजेत. शुकासारख्यांची गोष्टही अपवादात्मक आणि अहल्याबाईही अपवादात्मक. जुलमानें शुक किंवा अहल्याबाई निर्माण करूं लागणें हा कांहीं शहाणपणाचा मार्ग नव्हे. बरें पुढें काय?

**नाना**—मी चंद्रशेखरास उत्तर लिहून पाठविण्याचे विचारांत होतों, अनायासें आपण बोलाविलें तेव्हां आपला

विचार कळला ह्मणजे उत्तर लिहिण्यास फार सोईचें होईल. मी नाहीं तरी जरा संकटांतच होतो.

**रावसाहेब**—त्यांना असें लिहावें कीं, आपण मनांत गोष्ट आणिली, ती जरी जनरूढीविरुद्ध आहे तरी शास्त्रसिद्ध असून विचारांतीही सिद्ध आहे. परंतु आपल्यायेथेंच कार्य घडावें, कारण आमच्या येथें किंवा तिच्या माहेरीं रिवाज आहे जुना, त्यास अनुसरून ह्या गोष्टी नाहींत. बाबासाहेबांनीं जेव्हां मला या गोष्टीबद्दल विचारिलें, तेव्हां त्यांना मी असेंच सांगितलें कीं, माझा अभिप्राय कांहीं या गोष्टींविरुद्ध नाहीं, परंतु माझ्या घरीं या गोष्टी घडणार नाहींत.

**यमुनाबाई**—बायकांचें जीवित पुरुषांचे स्वाधीन. दुर्दैवानें जर पति गेला तर अन्य पतीच्या स्वाधीन असणें बरें, हें साधारण आमच्या सारख्यानां देखील समजतें. त्यांतून ज्यांचें वय राहिलें नाहीं, ज्यांला कोणी मागीत नाहीं, अशा विधवांचें लग्न होणार तरी कसें! परंतु ज्यांचें होत असेल, आणि ज्या करण्याला तयार असतील, त्यांचें करूं नये हें ह्मणणें कांहीं युक्त दिसत नाहीं. मनुष्याच्या सुखसाधनाचे मार्ग वाढविणें हें शास्त्रांचें काम का जीं साधनें असतील तीं बंद करण्याचें त्यांचें काम? याचें उत्तर कांहीं कठीण नाहीं. कोणी एका रोग्यानें जर वैद्यबोवांला विचारिलें कीं, माझ्यासारखे

रोगी अमुक एक औषधानें बरे झाले आहेत, मला तेंच औषध आपण कृपा करून द्या; त्याला जर बोवांनीं सांगितलें कीं, दुसऱ्यांचे रोग जरी बरे झाले, तरी तुला तें औषध चालेल अशी खात्री काय! तर या शंकेबद्दल आपण काय ह्मणूं? उघड आहे कीं, ही शंका योग्य नव्हे. न चालण्यासारखें कांहीं कारण असल्यास त्याचा पत्ता लावून औषधाची योजना करणें हें सुवैद्याचें काम; नुसती शंका काढून रोग्याला परत घालविणें हें कांहीं त्याचें काम नव्हे. ही जशी गोष्ट वैद्य शास्त्राची तशीच इतर शास्त्रांची. आणि धर्मशास्त्रानीं विवाहाचा मार्ग सरळ असून, विवाहाचा काल व इच्छा असून, व विवाह होत असून, त्याच्याआड शास्त्र आणणें ह्मणजे शास्त्राचा हेतूच पालटणें होय.

**नाना**—होय आई, अशी आपली उभयतांची जर समजूत आहे, तर मग वहिनीचे दुःखाचें ओझें फार लवकर कमी होतें खरें. मी आतां उत्तर लिहून पाठवितों; या वेळेस माझ्या मनाची स्थिति किती उत्साहजनक झाली आहे ! योजिलेलें कार्य सिद्धीस जाईल अशी उमेद वाटूं लागली आहे. बंधु वारल्याचें दुःख वहिनीच्या वैधव्य-दुःखानें ज्यास्ती असह्य वाटत होतें; तें कमी झाल्यासारखें वाटतें. वासुदेवाला आईचें दुःख कमी झालेलें पाहून कितीतरी बरें वाटेल? पुढें तो आहेच येथला, परंतु तूर्त कांहीं आईशिवाय त्याचें चालावयाचें नाहीं.

**रावसाहेब**—तिची पोचविण्याची तजवीज नीट कर बरें. मी जातो, मला थोडें बाहेर काम आहे.

( निघून जातात. )

**यमुनाबाई**—मी सगुणेला बरोबर घेऊन जाते नदीवर अंग धुण्यास. आज बराच उशीर झाला आहे, तिला स्पष्ट गोष्ट कळवावी ह्मणजे तिलाही मनांत नको शंका काढीत बसण्याला.

( निघून जाते. )

**नाना**—आपणही आपल्या कामाला जावें. आईच सांगत आहे वहिनीला; हें बरें आहे.

( निघून जातो. )

## प्रवेश ४ था.

### स्थळ-नानाचें मंदीर.

( नाना व त्रिंबक बसलेले आहेत. )

**नाना**—लवकर तयारी कर वहिनीस चंद्रशेखर यांचे गांवीं बहिणीकडे पोंचविण्याची. अरे, आतां काय, उभयतां वडिलांची संमति, खुद्द वहिनीची संमति, चंद्रशेखर स्वतः होऊन पुढें आलेला, मी त्याला उत्तर पाठविलें आहे कीं, लवकर रवानगी करून देतों वहिनीची.

**त्रिंबक**—मग हा सर्वच योग जमला ह्मणावयाचा. मी देखील गाडी तयार केली आहे, कशाला हवें रेंगाळत

बसावयाला. सांगा वहिनीला तयारी करण्याला, कीं आतां येतों पोंचवून. विवाह झाल्यानंतर जातीचीं खेकटीं पडतील. त्याचा विचार करितां येईल मागाहून. परंतु बायकोमनुष्य कोणी सोबत असलेलें बरें.

**नाना**–होय, तिची मैत्रीण आनंदीबाई आहे तयार जाण्याला. तिला कळवितों ह्मणजे जा निघून कसें एकदम. बरें आहे, मी जातों. ( निघून जातो. )

**त्रिंबक**–आपणही जावें. गाडी तयार करून आणावीं येथें. ( निघून जातों. )

( पडदा पडतो. )

# अंक २ रा.

## प्रवेश १ ला.

**स्थळ–चंद्रशेखर यांचें घर.**

**चंद्रशेखर**–नारायणरावाचें उत्तरही नाहीं, व प्रिय सखीची कांहीं वार्ताही नाहीं. यांत लोक काय अडथळे घालीत असतील. या विधवाविवाहाबद्दल न जाणों? मला तर प्रथम विवाहाहून अधिक हौस वाटत आहे. काय मोहक तो चेहरा! विधवांचें वैधव्य जुलमानें कायम ठेवणारे लोक मूर्ख किंवा दुष्ट यांपैकीं एक समजले पाहिजेत.

**पद.**

**( राग मारवा–कौकरीत कौकर कुहरवा या चालीवर. )**

**देह मनोमय मनहिं देहमय अद्भुत विधिनें रचिलें हे ॥**
**परस्परें वस्तु प्रतिबिंबचि समजावें सुज्ञानें हें ॥**
**हालवितां एकासीं हलतें दुसरें निश्चय बा पाहे ॥**
**या संस्कारा असत्य मानिती समज तयांचा नसे भला ॥**
**आत्मरूप जें नित्य तेंचि हें स्थिति पुढील नकळे मजला ॥**
**कर्मबंध दूरचा न धरला काय त्यांत ये उणेपणा ॥**
**भूत भविष्याचें ज्ञान तें केवळ तार्किकसें जाणा ॥**

माझ्या मनाला तरुणी पाहिल्यापासून जे विकार होऊं लागले आहेत, त्यांचें निरसन या वेदान्तविचारांनी होईल

असें दिसत नाहीं. त्यांचा संबंध कांहीं मागील जन्मांतील कृत्यांशीं दिसत नाहीं. सर्व संबंध हल्लींच्या दृष्टीचे व विकार या देहाचे दृष्टीस होणारा मोह मनाच्या मोहाला वाढवितो, आणि मनाचा मोह दृष्टीच्या मोहाला वाढवितो. असा विलक्षण परस्पर संबंध या मन आणि इंद्रियांचा दुसरा कोठें दिसत नाहीं. काय करावें, आमचा मित्र जांबुवंत अलीकडे कोठें आला नाहीं; त्यास बोलवावें ह्मणजे तरी कांहीं संवादानें मनाला विसर पडून वेळ जाईल. अरे, बाहेर कोण आहे?

**बाळा**–जी, मी हाय. काय हुकम?

**चंद्रशेखर**–आमचा मित्र जांबुवंत अलीकडे कोठें आला नाहीं, तुला कांहीं माहिती आहे कां?

**बाळा**–व्हय, मी पर्वाच्या रोज पायल व्हत त्यांस.

**चंद्रशेखर**–पर्वा पाहून काय? आज तुला कोठें भेटतील तर घेऊन ये. सांग, मी बोलाविलें आहे ह्मणून.

**बाळा**–जी, हा निघालों. (आपल्याशीं) धनीसाहेबांचं मन महिना पंधरा दिस उदास दिसतं, एखादी वस्त पाहिजे असून न मिळल्यासारखी दिसते. आज मनांत आणलं तर धा (१०) मुली सांगून येत्याल. परंतु तो त्यानी छंद सोडला म्हून लोकांचीं जेव्हां खात्री झाली तव्हां लोकांनीही त्यांचा सोडला. अलीकड तब्बेतींत फरक झाला हाय, एखादी मनाजोगती अप्सरा पाहिली

असावी खास. परंतु आपल्या कामाला आपण जावं, या तर्काशीं आपल्याला काय? असलच तसं कांहीं तर बाई-साहेबांच्या नोकरीला आणखी दोन माणसं लागत्याल.

( निघून जातो. )

**चंद्रशेखर**—अरे मला तर या सुंदरीचे रूपाशिवाय दुसरें कांहींच दिसेनासें झालें आहे. असा मला दोन वर्षांत अनुभव नाहीं. माझा निश्चय, माझें कार्यक्षमत्व, सगळें कसें नाहींसें झालें! माझे मित्र आतां मला ह्मण-तील तरी काय? परंतु तें कांहीं माझें मनांत येतच नाहीं. रात्रीं काय, दिवसा काय, घरांत काय, घराबाहेर काय, आपल्या मनाशीं काय, लोकांशीं काय, मला तर एकच छंद लागला आहे. शिवाय माझी खात्री आहे कीं, ही गोष्ट सगुणेला कळल्यावर ती कांहीं प्रतिकूल होणार नाहीं; परंतु तिच्या घरचे काय अडथळे आणतात नकळे. दीर, सासरा, मनुष्यें आहेत चांगलीं. परंतु जो तो भितो लोकरूढीला. अशी चाल नाहींना. यापुढें पुष्कळांची अक्कल गुंग होते. आमची तर अक्कल सगुणेच्यापुढें गुंग झाली आहे. करावें काय?

## दिंडी.

कधीं भेटे प्रिय सखी असें झालें।
अंतरंगीं ध्यान तें उभें ठेलें।
कधीं नव्हतें वाटलें असें प्रेम।
विरह वाढवितो त्यासी हाच नेम॥

## पद.

( नोहें नारी ही—या चालीवर. )

नाहीं भिन्न ती मजहुनि बाला । अन्तरंग जमला ॥ गात्रस्पर्शें प्रति गात्राला । वाटे बहु ही सुख-विमला ॥ भिन्न मानुं तरी कशी इजला । एक जीव हा द्विधा होउनि नरनारीरूपें नटला ॥ संशय तिलमात्र न उरला । [ थापांचीं अक्षरें ] मधुर वरा । अति रुचिरा । ललिता ॥ नाहीं० ॥ तत्वज्ञानियां केली कल्पना प्रकृति पुरुष या रूपांची ॥ अथवा माया ईश्वर ऐसा भेद तोचिही दाखविला । अर्थ त्याणिं हा मनिं धरिला ॥ नाहीं० ॥

**बाळा**—जी महाराज.

**चंद्रशेखर**—अरे, हा आला केव्हां? याला बोलाविलें कोणी?

**बाळा**—मला आतां धन्यानीं बाला म्हून न्हइ का हटकलं? तव्हांच मी ओ दिली. जांबत महाराजबी आलत.

**चंद्रशेखर**—अरे बोलाव त्यांस. ( जांबुवंत प्रवेश करितो ) या, तुमची स्वारी अलीकडे कोठें झुकली आहे?

**जांबुवंत**—आह्माला काय गाण्यांत समजतें? परंतु मला वाटलें एखादी अप्सरा आली असेल.

**चंद्रशेखर**—बायकांच्या गाण्याचा स्वर तर आपल्या चांगलाच ओळखीचा दिसतो. यावरून कानांची परीक्षा तर झालीच. कोठें एखाद्या बाजूस कोणी एखादी अप्सरा

आहे कीं काय, हें न्याहाळून पहा बरें, ह्मणजे डोळ्यांचा संशय नको राहावयास.

**जांबुवंत**–त्या बाजूस कांहीं काळें दिसत आहे. (उठून पाहतो, खुंटीला टांगलेला काळा पडदा हालवून) छे, हें नुसतें कापड आहे.

(परत येऊन जागीं बसतो. पूर्ववत्)

**चंद्रशेखर**–मग तुह्माला बायकांचा स्वर कसा ऐकावयाला आला?

**जांबुवंत**–नसेल बायकांचा, मग पुरुष तरी येथें कोण आहेत?

**चंद्रशेखर**–हें तर मोठें गूढ झालें. तर कदाचित् फोनोग्राफ तर नसेल ना?

**जांबुवंत**–होय बुवा, तसें असेल तर सांगवत नाहीं.

**चंद्रशेखर**–बरें तर, तुह्मी असे या पेटीकडे पाठ करून बसा पाहूं. कारण समोर तिचा आवाज कर्कश लागतो.

(जांबुवंत पेटीकडे पाठ करून बसतो.)

**चंद्रशेखर**–

**पद.**

**(चाल–गजराऽऽरे राग गौड सारंग अथवा आयीऽसमधनमो राग–मियाचा मल्हार.)**

**माळही जशीऽतशी तरुणी।**
**नाजुक मोहक पवित्र तैशी अति विलासिनी।**
**सगुणी वक्षःस्थल चुंबिनी॥**

**जांबुवंत**—आतां पाठ फिरवूं का? अशी पेटी कधीं नाहीं ऐकिली बोवा पूर्वी. अगदीं हुबेहुब मनुष्य. काय चमत्कार! इतके दिवस पेटीचें वर्णन नुसतें ऐकत होतों.

**चंद्रशेखर**—आतां बघा तर इकडे.

**जांबुवंत**—( पाठ फिरवून ) आपण फार पेटी उत्तम ठेविली आहेत खरी. अगदीं माणसांत आणि या पेटीच्या स्वरांत कांहीं फरक नाहीं खरा; परंतु पद्याचा अर्थ काय माळेवर कोणच्या वस्तूचा आरोप केला आहे?

**चंद्रशेखर**—मला ज्या विषयासंबंधी बोलावयाचें होतें, त्याचाच तूं प्रश्न केलास बरें झालें. अरे, आपला मित्र गुण्डोपंत त्याची मेव्हणी विधवा झालेली आपले बहिणी-कडे भेटावयास आलेली मी बरेच वेळा पाहिली; तिचें तरुण वय आणि मोहक रूप, तिजवर आलेलें दुःख, या तीन गोष्टींनी माझा मर्मभेद झालेला भरून येत नाहीं. मी तिजशीं होईल तर विवाह करण्याचा बेत मनांत आणिला आहे.

**जांबुवंत**—छे, छे, बोवा, असला अमंगल विचार तुमच्यासारख्यास काय उपयोगी! कुमारी काय थोड्या पडल्या आहेत. विवाहच करावयाचा असल्यास पुनर्विवाह पक्षाचे लोक आपल्यावर प्रसंग आल्यावेळीं पाहिले नाहींत कसे कुमारिकेशीं लग्नें करण्यास तयार होतात.

**चंद्रशेखर** ते होवोत बापडे, माझातर निश्चय ठरला.

**जांबुवंत**–ठरल्यावर कांहींच बोलणें नाहीं; परंतु या गांवात लग्न लावणारा ब्राह्मणसुद्धां मिळावयाचा नाहीं.

**चंद्रशेखर**–अरे पैशानें मिळतो, मी चवकशी करून ठेविली आहे; परंतु प्रश्न आहे कीं, सगुणेचे सासरची वडील मंडळी रुकार देतात की नाहीं. तिचा दीर माझे ओळखीचा आहे, त्याजविषयीं कांहीं संशय नाहीं, त्याचे विचार मला ठाऊक आहेत, आणि मी त्यास लिहिलें आहे त्याच्या उत्तराची वाट पाहात आहें.

**बाळा**–एक पत्र आलं आहे धनीसाबांच्या नावचं. पाहावं, नाना साबांच्याच गांवचा मनुष दिसतोय.

**चंद्रशेखर**–( पत्र वाचून आनंदाची मुद्रा करून ) प्रिया निघालिच, आतां भेटणार खास. मुख्य अडचण वडील मनुष्यांचे संमतीची ती निघाली. शेष अडचणी दुय्यम प्रतीच्या आहेत, पाहिलें जाईल त्याजबद्दल. मना फार अधीर होऊं नकोस, थोडे दिवस राहिले आहेत. पण ज्या रस्त्यानें प्रिया येणार त्या रस्त्याला आपल्यायेथील एक दोन माणसें पाठवावीं, ह्मणजे रस्त्याचा विषय आहे, एकास दुसरा मदत असलेला बरा. ( बाळास हांक मारून ) अरे. जा, आपले दोन शिपाई वडगांवच्या ( ह्मणजे नानासाहेबांच्या गांवच्या ) रस्त्याला पाठीव लवकर.

**बाळा**–होय महाराज. ( आपल्याशीं ) अरे हें कांहीं प्रकरण निराळं दिसतं आहे. असा नेटाचा हुकुम मला

पूर्वी कधी मिळालेला ठाऊक नाहीं, बरें कांहीं अधीक विचारून पाहूं. ( मोठ्यानें ) कोण येणार हें समजलं ह्मणजे मी शिपायांस चांगली ताकीद करून समजाऊन पाठविन; ह्मणून पायाजवळ विनंती करितों.

**चंद्रशेखर**—नानासाहेबांचा मित्र त्रिंबक ह्यांची वहीनी जी थोडे दिवसांत या घराची व माझी मालकीण होईल तीस तिचे मैत्रिणीसमवेत घेऊन येत आहे, त्यांचे बंदोबस्ताकरितां शिपाई रस्त्यावर पाठवावयाचे समजलास ?

**बाळा**—आतां समजलों, अक्षि ताकीद करून पाठिवतों. हा निघालों. ( जातो )

**जांबुवत**—मोतीचूर पुरणपोळींचे ढीग पडताहेत; आतां बरीच चंगळ झाली ह्मणावयाची, आपल्या मनाजोगा कांहीं संबंध नाहीं, परंतु दगडाला शेंदूर लागला ह्मणजे झाला मारुती, तसें आपलें कुटुंब ह्मणजे आह्मांला झालें वंद्य. कोणी का असेना.

**चंद्रशेखर**—तुमच्यासारख्या तिसऱ्या आवताररूपाला वाईट काय कळणार !

**जांबुवंत**—एकूण आह्माला अवताराची योग्यता मिळाली ! न कळलें ह्मणून काय झालें. बरें आह्मांला एकदां कळूं द्या कधींचा बेत आहे तो ? ह्मणजे हजर राहाण्यास बरें पडेल घरच्या माणसाला बोलावणें नकोच.

**चंद्रशेखर**—तें कळवूं तुह्माला नक्की झालें ह्मणजे.

**जांबुवंत**—बरें तर, मला आतां हुकूम असावा.

**चंद्रशेखर**—या. ( जाबुंवत निघून जातो. ) अरे, बाहेर कोण आहे ?

**रावजी**—जी महाराज, काय हुकूम ?

**चंद्रशेखर**—बाळंभटजीला बोलाव पाहूं. लवकर ये.

**रावजी**—जी महाराज. ( निघून जातो. )

**चंद्रशेखर**—मी कांहीं दिवसांपूर्वीं स्वायत्त, शान्त व समाहित होतों, तोच हल्लीं अगदीं जलतरंगाप्रमाणें किंवा विद्युत्प्रकाशाप्रमाणें तरल झालें आहें, कसा, याचा माझा मलाच चमत्कार वाटत आहे.

## पद.

( हारि मजला चालवेऽनाऽ या चालीवर ).

**धीर मला धरवेऽनाऽ ॥ ध्रु० ॥**
**उत्सुक इतकें मन होइल अशी नव्हती मजला कल्पना ॥**
**जेव्हां होइल भेट सखीची तेव्हां येइल स्वस्थाना ॥**

**रावजी**—बाळंभटजी आलेत.

**चंद्रशेखर**—येऊं दे त्यांना इकडे.

**बाळंभट**—स्वारीची तब्बेत कशी काय आहे ?

**चंद्रशेखर**—ही पाहतां तशी आहे.

**बाळंभट**—आह्मांला काय गरीब मनुष्याला कळतें ! तिकडील कांहीं अधिक खबर आली आहे का !

**चंद्रशेखर**—होय, वधू येणार आहे एक दोन दिवसांत.

**बाळंभट**—आमची मुहूर्ताची तयारी आहे. गांवांत भिक्षुक मंडळी आहे तयार ग्रामण्याकरितां. करीनात ग्रामण्य. आपण तिकडे गेलें नाहीं ह्मणजे झालें. सगळेंच कोठें आहेत पूर्वीसारखें हट्टी? आपल्याकडे येणारी मंडळीही अर्धा गांव आहे. दुफळी ही कोणत्या गोष्टींत नाहीं?

**चंद्रशेखर**—दुफळी मोडतां मोडतां मोडेल. आपण कोणते गोष्टीचा आग्रह धरिला नाहीं ह्मणजे झालें.

**बाळंभट**—होय, एवढीच गोष्ट त्यांतली. मी आमच्या कामाची सामुग्री तयार करितों. मुहूर्त आल्यावर नक्की करूं. जातों. ( निघून जातो. )

**चंद्रशेखर**—आपणही आपल्या कामाला जावें; शोध करून पहावा गुंडोपंताकडे. त्यांच्याकडेही कांहीं जरूर खबर आली असेल.

( निघून जातो ).

---

## प्रवेश २ रा.

**स्थळ—अरण्य, डोंगर, नदी वहात आहे.**

**( आनंदीबाई, आणि सगुणा व तिचा मुलगा अशीं पडदा उघडण्याबरोबर दिसतात. )**

**आनंदीबाई**—काय हो मनोहर स्थळ हें? पाणी किती स्वच्छ, हवा किती गार, झाडें किती शोभिवंत, पक्षी

किती मजेदार? प्राणिमात्राला उल्हास वाटल्यावांचून राहावयाचा नाहीं.

**सगुणा**—अहो मनोहर वस्तु पाहिल्या ह्मणजे ज्या मनोहर वस्तु आपल्याजवळ नाहींत त्यांची आठवण होऊन उत्सुकता कधीं कधीं असह्य होते. त्यांतलीच वेळ आहे ही.

**पद.**

**पति एक मिळाला होता**
**परि दैवें त्या विपरीता**
**लाविलें मृत्युच्या पंथा**
**मज वाटत नव्हतें चित्ता। कीं यांतुनि का गति उरली॥**

**परि आलें प्रभुच्या हृदया**
**प्रेरिलें सदय होउनियां**
**चंद्रासि योग्य जाणुनियां**
**ती मूर्ति अवलोकुनियां। मनिं माझे दृढ बिंबली॥**

**प्रिय कधीं भेटती मजला**
**ही चिंता झुरवि मनाला**
**पाहुनि रम्य वस्तूला**
**संताप अधिक जाहला। अशि नव्हती स्थिति पाहिली॥**

**आनंदीबाई**—या स्थितीचा उतारा लवकरच होईल. त्या मार्गातच आपण आहोंत हल्लीं. विशेष काळजीचें कारण नाहीं. हीं मुलें पहा कशीं मासे धरण्यांत रंगून गेलीं आहेत.

**सगुणा**—त्यांला इकडे बोलवा. आपण त्यांस कांहीं तरी देऊं.

**आनंदीबाई**—अरे मुलांनों इकडे यारे या.

( बाळू व काळू जवळ येतात. )

**बाळू**—काय, तुमास्नी काई काम हए का आमच्यापस?

**सगुणा**—अरे हा घ्या रुपया तुह्मांला खाऊसाठीं, आणि आतां मासे मारूं नका.

**बाळू**—( जवळ येऊन रुपाया घेतो. ) तुमांला नाहीं होय मासे धरलेलं आवडत. आमचंतर पोट त्यावर. अमांला असं तुमच्यासारखं करून कसं चालंल? पण आता नाहीं मारीत तुमची मर्जी नाहींतर. अरं काळ्या, आपलं जालं ठेव गुंडाळून, दुपारून पाहूं. तुमची मर्जी हएका नदीच्यापलीकड एक साधु रातात त्यांचं दर्सन घ्यायची. अमी तुमांला तिकडं घेऊन जातों हवं तर.

**सगुणा**—होय, साधुदर्शन आमच्यासारख्यांला घडलें तर पुढील फलाचें सुचिन्हच समजलें पाहिजे. आनंदीबाई, कितीतरी या मुलांनीं आपल्यावर उपकार केले आहेत? नाहीं तर आपल्याला कोठून समजणार येथें कोण राहातो आणि काय करतो.

**आनंदीबाई**—होय, तुह्मांला देवानेंच बुद्धि दिली ह्मणावयाची त्या मुलांना मजकडून बोलवविण्याची. नाहीं तर ही अपूर्व संधि फुकट जाणार होती.

**बाळू**–तुमच्या मुलाला मी घेतों. इकडे आणा (जवळ येऊन वासुदेवास घेतो.) साधु नुसता जटा ठेवनारा अन् राख लावनारा नव. मोटा श्येना हये बगा. जरा डोल्यांनीं कमी दिसतं पन् येरवीं अंगानं मजबूत मोटा. शास्तर सर्व ठाव हए. आमच्या गांवांत कांहीं बरामन लोकांत तक्रारी पडल्या तर त्येंच्या सांगन्याला कोणी मोडीत न्हाई.

**सगुणा**–बरें आहे आपण दर्शन घेऊं. त्यांची सुप्रसन्नता असली ह्मणजे तदंगभूत सर्व लाभ झाले ह्मणावयाचे.

(एका बाजूनें नदी ओलांडून आश्रमांतील झोंपड्याकडे येतात.)

**बाळू**–काल्या, सामीस जाऊन सांग. तेच्या दर्सनाला मंडळी येतात म्हून. धाव जलदी.

**काळू**–व्हय, हा बग गेलोंच (धांवत जातो व कळवून येतो.) या इकड, अक्षी बगा आनंदांत हैत सामिमहाराज.

(सगुणा, मुलगा आणि आनंदीबाई नमस्कार करतात.)

**नीळकंठस्वामी**–(सगुणेकडे पाहून) सौभाग्यवती सौभाग्यवती हो. हा मुलगा तर मोठा शहाणा व चपळ दिसतो. असाच मुलगा तुला दुसराही होईल आणि नवरा मोठ्या प्रेमानें वागवील. कांहीं शंका मनांत आणूं नकोस. (वासुदेवास जवळ घेतो).

**सगुणा**–स्वामीचें वचन या हतभागिनीस अमृत वृष्टिप्रमाणेंच आहे. परंतु मी हल्लीं वैधव्यस्थितींत आहें,

दुसऱ्या लग्नासाठीं जात आहें, महारांजांजवळ गोष्ट चोरून काय उपयोग? ह्मणून खरें वृत्त कळविलें. आतां स्वामीचें वचन माझे अनुभवास येईल अशी माझी खात्री झाली आहे. ( पुन्हा नमस्कार करून बसते. आनंदीबाई व मुलगाही बसतात. )

**नीळकंठस्वामी**–बरें. ( आनंदीबाईकडे पाहून ) कोठें लग्नाचा योग जुळला आहे?

**आनंदीबाई**–केडगांवी चंद्रशेखर ह्मणून वकील आहेत. त्यांनीं आपली बायको वारल्यानंतर लग्न न करण्याचा निश्चय केला. परंतु कांहीं कालानें ही माझी मैत्रीण तिच्या बहिणीच्या घरीं त्याच्या दृष्टिस पडली. त्यानंतर त्यांनीं आपला पहिला निश्चय सोडून हिचें पाणिग्रहण करण्याचा हेतु दर्शविला. हल्लीं स्वामीचे वचनानें तो हेतु सिद्ध झाला अशी आमची खात्री झाली आहे. आज आह्माला स्वामीवचनानें काळजींतून दूर केलें. तेव्हां माझ्या मैत्रिणीच्या आंनदांत काय कमी राहिलें पुढील सर्व गोष्टी आशिर्वादाप्रमाणें घडून येतील यांत कांहीं शंका नाहीं.

**निळकंठस्वामी**–तुमच्या मैत्रिणीचें नांव काय?

**आनंदीबाई**–सगुणा.

**नीळकंठस्वामी**–वाः नांव तरी काय मूर्तिप्रमाणेंच आहे. बरें, पहिले सासऱ्याचें नांव काय?

**आनंदीबाई**--नारायणराव, वडगांवचे इनामदार.

**नीळकंठस्वामी**--( स्वतःशीं ) अरे हा तर आपला धाकटा बंधु. मी दहा वर्षें देशांतरी प्रवासांत गेल्यामुळें मला कोणी ओळखीत नाहीं, पण मी त्यांस ओळखितों. हा लग्नाचा योग तर चांगला जुळला आहे. परंतु हट्टी मंडळी त्रास दिल्यावांचून कोठून राहाणार? ते ह्मणतील, याला शास्त्राधार नाहीं. ग्रामण्य माजवितील, भांडतील. पहिल्या विवाहाच्या मुलास खाण्यास नाहीं तर दुसऱ्या विवाहाच्या मुलास खाण्यास कोठून द्यावें? ह्मणून अर्थ-शास्त्राच्या कल्पना पुढें आणतील. दुष्ट निर्बंध मोडून टाकण्याचें सोडून एकपक्षीय नीतिशास्त्राचा उपदेश कर-तील. मूर्ख बेटे. दुसऱ्या जास्त महत्वाच्या गोष्टी आहेत ह्मणून सांगतील. परंतु आपल्याकडून होईल तितकी मदत आपण करूं. याउपर होणार तें होईल. ( मोठ्यानें ) सगुणें तूं जा. जेव्हां गरज पडेल तेव्हां याच मुलांकडून मला कळीव; ह्मणजे जातिसंबंधी प्रश्नाचा उलगडा करण्या-साठीं माझ्यानें होइल तितकी खटपट मी करीन. जा, माझा आशीरवाद तुला पूर्ववत् आहे. समजलीस? ( वासु-देवास परत देतो ).

**सगुणा**--तथास्तु. ( नमस्कार करिते. आनंदीबाईकडे पाहून ) त्रिंबक वगैरे मंडळी आपली वाट पहात असतील, चल लवकर. ( सगुणा, आनंदीबाई, नारायण, बाळू व काळू हीं निघून जातात. )

**निळकंठस्वामी**—आपणही आपलें काम करण्यास जावें. ( शिष्यास हांक मारतो ) वामन—

**वामन**—गुरुजी, स्नानाची तयारी केली आहे, आपण चलावें; मी आलोंच मठ बंद करून. ( स्वामी जातात. ) गुरूचा आणि आलेल्या स्त्रियापैकीं धाकटीचा कांहीं-तरी वडीलधाकटेपणाचा संबंध असावा असें त्यांच्या आश्चर्ययुक्त आणि सस्नेहमुद्रेवरून दिसलें; आपण ब्रह्म-चारी, आपल्याला जास्त चौकशी कशाला.

( निघून जातो. )

पडदा पडतो.

# अंक ३ रा.

## प्रवेश १ ला.

### स्थळ-गुंडोपंताचें घर.

( गुण्डोपंत बसला आहे व बाहेर गडी बसला आहे. )

**गुंडोपंत**—रामा, वडगांवची मंडळी आली कीं नाहीं, काय खबर आहे? जसें चंद्रशेखरास पत्र आलें होतें तसें मलाहि आलें होतें; त्या रस्त्याकडे आह्मी माणसेंहि धाडलीं होती. पहा बरें तिकडे जाऊन.

**रामा**—जी होय. हा निघालों. (परत येऊन) चंद्रशेखरराव आपल्याकडे येताहेत.

**गुंडोपंत**—येउं देत. यायला पाहिजेच होते.

**चंद्रशेखर**—कशी काय खबरबात?

**गुंडोपंत**—मीही खबरीच्याच चौकशींत आहें. या बसा, मी त्या रस्त्याकडे माणसें पाठविलीं आहेत. इतक्यांत बहुतकरून समजेलच. गांवांत कांहीं उपहासखोर मंडळीनें विरुद्धपक्ष माजविण्याची खटपट चालविली आहे; आपल्यास कळलें असेलच.

**चंद्रशेखर**—विरुद्धपक्ष ह्मणजे चित्स्वरूपाचा एक अनाद्यनंत भावच दिसतो. कधीं देशभेदानें, तर कधीं धर्म-

भेदानें, कधीं जातिभेदानें, तर कधीं कुलभेदानें कधीं तर एकाच कुलांत बंधुबंधूंत, पतिपत्नींत, पितापुत्रांत, गुरुशिष्यांत हा संचार करितो अक्षमित्व हें याचें मूल, अभिमान ही याची पताका, अविवेक, उपहास हीं याचीं हत्यारें क्षय हा याचा अखेर हेतु, हा क्षय कधीं एकच पक्षाचा व कधीं उभय पक्षांचाही होतो. मी तर वृथावादांत पडत नाहीं. उलट पक्षास जें करणें असेल तें करोत बिचारे.

**गुंडोपंत**—समजुतीनें होईल तितकें करून पाहिलें पाहिजे, सर्वतोपरी उपेक्षा करून चालणार नाहीं. विरुद्ध-पणा मोडावा, वाढवूं नये.

**चंद्रशेखर**—आपल्या सांगण्याबाहेर मी नाहीं.

**गुंडोपंत**—आपला पक्ष जितका बळकट करवेल तितका मी करीत आहें. भिक्षुक मंडळी पैशानें, समंजस समजुतीनें, मध्यस्थ प्रोत्साहनानें वळतील तितके वळविण्याची खटपट मी करीत आहे. सिद्धी जरी आपल्या हातीं नाहीं तरी यत्न आपल्या हातीं आहे. तो केला नाहीं तर दोष आपला. परिचारकवर्गांमध्येंदेखील सांगण्याप्रमाणें सर्व गोष्टी व्हाव्यात असा बंदोबस्त केला आहे.

**चंद्रशेखर**—आपल्यासारख्या विचारी आणि युक्ति-वान मनुष्यास कोणती गोष्ट असाध्य आहे? चतुर मनु-

ष्याच्या सर्व सिद्धी करतलगत आहेत. मला आपण सांगाल तसें चालावयाचें आहे.

**रामा**–( आंत येऊन ) वडगांव कडील मंडळीच्या गाड्या आल्या असें तिकडे गेलेले लोक सांगत आले. आतां मंडळी आपल्या दृष्टीस पडेल.

**गुंडोपंत**–घरांत कळविलेंसका ?

**रामा**–होय धनी साहेब. तिकडे सर्व तयारी केलेली हए. अक्का साहेब अगदीं वाट पाहत हयती, नवीन मंडळीची उतरण्याची तजविज आपल्या रामबागत केली हए.

**गुंडोपंत**–बरें झालें, एक काळजी करण्याचें सुटलें कलम. आतां पुढील उद्योगास लागण्यास मनांत या संबंधानें विकल्प येण्याचें कारण राहिलें नाहीं.

**चंद्रशेखर**–मलादेखील घरीं जाऊन व्यवस्थेला च लागलें पाहिजे सबब मी तूर्त रजा घेतों.

**गुंडोपंत**–अहो, आपण एकदां भेटून तर चला, असा आनंदाचा दिवस वारंवार कोठें येतो ?

**चंद्रशेखर**–आपल्या ह्मणण्याप्रमाणें मी येण्यास तयार आहे. चलावें. ( दोघे निघतात रामा पुढें चालतो ).

---

## प्रवेश २ रा.

**स्थळ-रामबाग.**

( गुंडोपंत व चंद्रशेखर प्रवेश करतात. )

**चंद्रशेखर**–या बागेंतील वाड्यांत मंडळी आल्यानें बागेचें रूपदेखील बदललें आहे.

**गुंडोपंत**–आपल्यासारखे गुणग्रहीते असले ह्मणजे बदलतें नाहींतर जगाला कंटाळलेले, माणसांला कंटाळलेले, लोक काय थोडे आहेत? त्यांच्या दृष्टीस कांहींच बदलत नाहीं.

**चंद्रशेखर**–मला वाटतें नुक्ती मंडळी आलेली आहे, इतक्यांत आपण तिकडे जाऊं नये, कांहीं वेळ गेल्यावर जावें हें बरें. ह्मणजे जरा विश्रांतीनंतर भेटीचे श्रम दिले असें होईल.

**गुंडोपंत**–आपल्या म्हणण्यास माझा रुकार आहे, आपण जरा बागेंत फिरूं म्हणजे तिकडे विश्रांति इतका वेळ जाईल मी तिकडे निरोप पाठवितों उत्तर आलें म्हणजे जाऊं.

**चंद्रशेखर**–होय तसेंच.

**गुंडोपंत**–( रामास हाक मारून सांगतो. ) इतकें कळीव कीं मी व चंद्रशेखर असे बागेंत आहों. त्यांना सवड झाली ह्मणजे येऊं. ( रामा जातो. )

**चंद्रशेखर**—काय आपण बाग राखला आहात सांगूं! फळझाडें, फुलझाडें, लतामंडप, मधून मधून चित्रें, फवारे अशा या रम्यस्थलांत कोणालाही बरें वाटेल. आपण या जाग्यांत या मंडळीची राहण्याची योजना केली आहे. हें फार योग्य.

**गुंडोपंत**—ही मंडळी ह्मणजे मला कांहीं परकी का आहेत? त्यांत आपल्यासारख्या मित्राचा संबंध उत्पन्न झाल्यावर अगत्याला केवढा दुजोरा आला ह्मणून सांगावा? आणि अशा मंडळीसाठीं योजना केली तर त्यांत नवल काय?

**चंद्रशेखर**—नवल कसलें? अकृत्रिम स्नेह हेंच जगांतलें सर्वांत मोठें नवल आहे. हा एकदा उत्पन्न झाला ह्मणजे स्वपरभाव लय पावतो; परंतु महात्मतेशिवाय इतर ठिकाणीं असा स्नेह दृष्टीस पडत नाहीं. आपल्याठिकाणीं ती महात्मता आहे.

**गुंडोपंत**—मला कांहीं वाटत नाहीं कीं यांत मी कांहीं अधिक केलें. मात्र आपली गुणग्राहकता एकदेशीय नसून सार्वत्रिक आहे, हें खरें. या, आपण क्षणभर या लता-मंडपाजवळ बसूं. (दोघे बसतात.) (रस्त्याकडे पाहून) हे कोण आपणाकडेच येत आहेत? (ओळखून) होय, हा चिंतोपंत.

**रामा**—महाराज चिंतोपंत आल हत.

**गुंडोपंत**–होय, येऊं दे, त्यांना इकडे आह्मी बसलों आहोंत ह्मणून सांग.

**चिंतोपंत**–( नमस्कार करून बसतो. )

**गुंडोपंत**–काय चिंतोपंत! कसें काय वर्तमान? भिक्षुक मंडळी, शास्त्री मंडळी, गृहस्थ मंडळीचें आणि रामभटजींच्या घरांतील मंडळीचें आणि रामभटजीचे मित्र शामराव यांचें—

**चिंतोपंत**–वर्तमान सर्व कुशल आहे. आपल्या योजनेंत बहुतेक कोठें न्यून पडेल असें स्थल दिसत नाहीं. धन्याची पुण्याई, चाकरांचे श्रम, यश देणारा नरोत्तम, लग्न दिवसाचा एकदा निश्चय करून वैदिक भाग उरकून गेला ह्मणजे मग जेवणाखाणाचें आणि सभेच्या समारंभाचे व्यवस्थेस लागण्यास बरे पडेल. गृहस्थ मंडळी बहुतकरून अनुकूल आहेत; भिक्षुक मंडळीमध्यें नाठाळ कायते रामभटजी. त्यांचा विचार चालला आहे भिक्षुकांची सभा करण्याचा. त्यास जितकी अडचण घालवेल तितकी घालण्याची तजवीज इकडील आज्ञेप्रमाणें ठेविली आहे. शास्त्रीमंडळीसदेखील आपाशास्त्री यांचेमार्फत जितके वळवेल तितके वळविण्याची खटपट केली आहे. रामभटजीचे कुटुंब इकडील घरांतील लोभामुळें रामभटजी कडले नाहीं; परंतु शास्त्रार्थाचे गोष्टींत बायकांस प्रत्यक्ष कोण विचारतो? बाकीं त्यांचा मुलगा त्यांचेकडील नाहीं, ही एक आपल्यास मोठीच अनुकूल गोष्ट समजली पाहिजे.

**गुंडोपंत**—बरें आहे; आह्मी वैदिक विधि एक दोन दिवसांत उरकून घेतों. आजच मंडळी येथें आली आहेत, अजून आह्मी भेटलों नाहीं; परंतु बाळंभटजी तयार आहेत त्यांस बोलावून आह्मी कळवितों. जा, तुह्मी आपले कामगिरीवर इकडील काम आह्मी संभाळितों.

**चिंतोपंत**—आज्ञा. ( निघून जातो ).

**चंद्रशेखर**—चिंतोपंताकडे काय कामगिरी आपण ठेविली आहे तें कळत नाहीं. मनुष्य हुशार दिसतो आहे परंतु आपण किती प्रयत्न केलें तरी दुफळी ही मोडणार नाहीं असें मला वाटतें.

**गुंडोपंत**—ती मोडावी यासाठीं तर इतकी खटपट. नाहीं तरी अर्ध्याहून अधीक गांव आपलेकडे आहेच. प्रयत्नरूपी परमेश्वर आहे. "आस्ते भग आसीनस्य, उद्योगिनं पुरुषसिंहं" इत्यादि वाक्यें याच गोष्टीचें समर्थन करीत आलीं आहेत. आपण उद्योग सोडूं नये, त्यांत साधन सामुग्री चांगली असली ह्मणजे कार्यसिद्धी बहुतकरून होते. माझा मानस असा आहे कीं, रामभटजीस सर्व बाजूंनीं निराधार करून त्यासच विधवाविवाहपक्षाकडे घ्यावा, सोडूं नये. यासाठीं योजना नाना तऱ्हांनीं केल्या आहेत; त्या आपल्या निदर्शनास क्रमशः येतील. मुख्य साधन, आपण आणि आपली प्रिया. कसे ह्मणाल तर ऐका, आपल्या उभयतांच्या नैतिकचालीविषयीं लोकांचें उत्तम

मत, आपला कामाकाजाचा लौकिक, आणि उदारपणा, प्रियेचें अलौकिक लावण्य, हीं साधनें मध्यस्थांस काय पण शत्रूंस देखील वळविण्यास पुरीं आहेत; मग प्रयत्नांत शिथिलता कशाकरितां ?

**चंद्रशेखर**—ईश्वरेच्छेनें आपले प्रयत्न सफळ होवोत. आणि योजिलेल्या कार्यापासून आपणास व आह्मास उपाधि न होवो, ह्मणजे झालें.

**रामा**—तिकडील निरोप आला हए आपणास बोलावल हए.

**गुंडोपंत**—चला, आपण तिकडून जाऊन मग इतर व्यवस्थेस लागूं. ( दोघे निघून जातात. )

---

## प्रवेश ३ रा.

**स्थळ—रामबागेंतील वाडा.**

**( शारदाबाई, सगुणाबाई, तिचा मुलगा आणि आनंदीबाई बसलेली आहेत. )**

**रामा**—यजमानसाब व तात्यासाब ( चंद्रशेखराचें घरगुती नांव ) आल हयती.

( सर्व उठून उभे राहातात, गुंडोपंत व चंद्रशेखर आंत येतात. )

**शारदाबाई**–( आसने दाखविते ). आपण आल्यानें कितीतरी बरें वाटलें ? त्यांत तात्यासाहेबांचीतर माझ्या बहिणीवरची कृपा किती म्हणून सांगावी.

**चंद्रशेखर**–माझी कृपा ह्मणण्यापेक्षां माझ्यावर कृपा ह्मटलें असतां ज्यास्त योग्य होईल. कारण श्रीची इच्छा ज्यास होते त्यास ती मिळतेच असें नाहीं. परंतु श्रीच ज्याचे घरीं चालून येईल तिला नको कोण ह्मणेल! काय सांगावें.

( राग तोडी अथवा )

आस मनिची न उरली । किमपिहि आस मनिची० ॥
ध्रुपद ॥ बघुनि प्रियतमा मजसि वराया येथें आलेली ॥
पाहुनि रतिसम रूप प्रियेचें तहान भूक गेली ॥
शंकित होतों मनीं बहु आपल्या ही मज मिळेल कैशी ॥
परी प्रियेनें प्रेम ओळखुनी हौस पुरी केली ॥

**सगुणाबाई**–

वर्णना योग्य नाहीं ही दासी आपुली ॥
वैधव्यामाजिं दीना बहुतांनीं पाहिली ॥
गुणवंता एकस्याला ही रम्या वाटली ॥
ग्राहकता वर्णनीं या दृष्टीची आपुली ॥
(मज अपुली दीसली ॥ )

**शारदाबाई**–

मला दिसतां वर्णना योग्य दोघे ॥
रति मदनाचें युग्म जसें शोभे ॥

कनक सौदामिनी मेघ एकमेकां ॥
शोभवीती अति मोहविती लोकां ॥
धैर्य तुमचें हें वर्णनार्ह मोठें ॥
बहु न दिसतें लोकांत असें कोठें ॥
जुन्या मार्गातें धरुनि राहणारे ॥
रूढि कैशी आह्मि ह्मणति सोडुं सारे ॥

**रामा**—बाळंभटजी आल हयती महाराज.

**गुंडोपंत**—येऊं दे त्यांना, त्यांचेंच काम आहे.

**रामा**—चलावं.

(बाळंभट आंत येतात.)

**बाळंभटजी**—मंडळी आल्याचें ऐकिलें ह्मणून ह्मटलें शोध घ्यावा.

**गुंडोपंत**—वः याचें नांव सावधपणा. नाहींतर सांगितल्या गोष्टीला दाहा अडथळे आणणारे लोक काय कामाचे? तुमची सर्व तयारी आहेना?

**बाळंभटजी**—हो, हुकमाचा उशीर.

**गुंडोपंत**—बरें तर, घ्या उद्यांचे उद्या आटपून.

**बाळंभट**—माझेंही ह्मणणें तेंच. मग करीनात बापडे शास्त्रार्थ सावकाश. त्यास आपण आहांत व ते आहेत. होऊं दे, वादवितंडा काय व्हावयाचें असेल तें. आह्मां भिक्षुकांना नाहीं त्याची मोठीशी पर्वा.

**गुंडोपंत**–आम्ही काय बोलवायची मित्रमंडळी ती बोलावितों. तुम्ही घ्या आपलें काम उरकून. लोकरीती-प्रमाणें द्वितीय संबंधाचा सोहाळा बेताचाच करावयाचा असतो.

**बाळंभटजी**–बरें आहे तर, मला आज्ञा असेल तर मी जातों आपल्या कामाला.

**गुंडोपंत**–उठा चला, उशीर नको. ( बाळंभटजी जातात. ) आपणही जावें आपल्या कामाला कसे. तात्या-साहेब आपण बसतां कीं येतां?

**चंद्रशेखर**–मीही येतों; मलाही थोडें काम आहे. ( दोघे विचारून निघून जातात. )

**पडदा पडतो.**

# अंक ४ था.

## प्रवेश १ ला.

**स्थळ-रामभटजींचें गृह.**

**( रामभट, सरदार आणि पेनशनर असे बसलेले आहेत. असा देखावा पडदा उघडल्याबरोबर दिसतो ).**

**रामभट**—काय हो, आपल्या सारखी मंडळी गांवांत असून कांहींच मानमर्यादा राहिली नाहीं. विधवाविवाह ह्मणजे कलियुगांत वर्ज्य मानिला असून धडधडीत शास्त्री भिक्षुक लोक जाऊन पहातात. गृहस्थांचें राहूं द्या. ते विलायतलासुद्धां जाणार आणि येथें येऊन अधिकारी होणार. त्यांच्याशीं वाद घालावा कोणी आणि घालून उपयोग काय? फार झालें तर प्रायश्चित्तानें होईल तो फायदा बाकी ते कांहीं जातीबाहेर राहातात? अहो त्यांचे मित्र त्यांचे घरीं जेवणार ते पुन्हां आपल्या मित्राशीं. असें करीत करीत शेवटीं आपले घरापर्यंत देखील परिणालिका जुळावयाची. त्यांत आक्षेप घेऊन उपयोग काय? अहो सरकारांनीं कायदा केला आहे तर त्याप्रमाणें मिळकतीला वारस होऊं दे संतती. पण लग्न लावायाला आणि पहावयाला तुह्मी जा असें तर सरकार कोणास ह्मणत नाहीं! मग ही मर्यादा आमची आह्मीच टाकली कीं कोणी?

**सरदार**—आमचे आह्मीच नाशाला कारण होत आहों यांत काडीइतकादेखील संशय नाहीं. ही सगळी सुधारणा माजली आहे. आतां या जुन्या पक्षाचे उत्तरोत्तर चालेल असें दिसत नाहीं. (छातीला हात लावून खेदानें) धर्मलय होणार, कली माजणार, भविष्य पुराणांत सांगितलेल्या गोष्टी खोट्या कशा होतील? सर्व जाति एक होणार, गायत्री, संध्या यांचा लोप होणार, भक्ष्याभक्ष्यविचार सुटणार, स्त्रियांचे व पुरुषांचे हक्क बरोबरीवर येणार, देव ब्राह्मणावरील भक्ति कमी होणार, आणि देशभक्ति वाढणार, काशी जाऊन कांग्रेसची यात्रा सुरू होणार.

**पेनशनर**—एकादे वर्षीं मोडली ह्मणून नेहमीं मोडते असें नाहीं. मोडते कशानें? पण आपण जर असा खेद करून उत्साह टाकिला तर आमच्या पक्षाला पुढारी कोण राहाणार? आपण असा खेद करणें योग्य नव्हे. सुखदुःख, लाभालाभ, जयापजय, हे चक्र जगांत नेमिक्रमानें फिरत आहे. यांस भिऊन काय उपयोग? आपल्या सारख्या अनुभवी आणि संसारपटु गृहस्थांना आह्मी काय सांगावयाचें आहे? परंतु आपली अशी स्थिति पाहून सांगणें भाग जाहलें. (अस्तन्या वर सारून) या सुधारकांची खोड जिरविणारा हा नाना आहे तोंपर्यंत ध्यानांत ठेवा हे चाळे कांहीं चालावयाचे नाहींत. ग्रामण्यं तर माझे हातचे मळाप्रमाणें आहे. शुक्लकृष्णपक्षाला उशीर काय? गांवांत चार आमं-

केलीं कीं झाली सभा, कीं घातला बहिष्कार. हा लागलों त्या तयारीला. कोठें आहे रे तो जानू शिपाई?

**जानू**—जी महाराज.

**पेनशनर**—ठरवा रामभटजी वार आणि वेळ, कीं पाठवितों याला बोलावणेंकऱ्यास सांगण्याला. धर्मरक्षणासाठीं जर झटलें नाहीं तर दुसरें काय आपल्या उपयोगीं पडावयाचें आहे? 'धर्म स्तमनु गच्छति' सद्गति देणार काय तो एक धर्म. मग उपेक्षा कशी करावी?

**रामभटजी**—वार आणि वेळ काय ठरवायचे आहेत? त्यांत काय मुहूर्त पहावयाचा आहे? मंडळी जमेल असा साधारण अजमास पाहून आपणच ठरवाल ती वेळ.

**पेन्शनर**—उद्या संध्याकाळीं कबूल असेल तर उद्यांची तयारी करितों राममंदिरांत चार वाजतां.

**रामभटजी**—उत्तम, उत्तम.

**सरदार**—आमंत्रणें पोचण्याची तजवीज जाहली म्हणजे झालें. त्यांत दुसरें काय आहे? कांहीं घरीं कळविण्याची मी तजवीज करितों आणि कांहीं घरीं आपण. बरें मजकुराच्या चिठ्या करिता कीं तोंडीं कळवितां?

**रामभटजी**—तोंडीं कळविलें म्हणून काय झालें मजकूर कायतो इतकाच कीं, या गांवांत एका मोठेठिकाणीं धर्माविरुद्ध कृत्य घडलें आहे, त्याचे विचारासाठीं ग्रामस्थानीं अगत्य यावें.

पेन्शनर–नुसतें धर्माविरुद्ध कृत्य ह्मटल्यानें लोकांस कसा स्पष्ट बोध होईल! बाळंभटजींच्या साह्यानें चंद्रशेखर याणीं धर्माविरुद्ध विधवेशीं लग्न लाविलें आहे, त्याचे विचारासाठीं असें स्पष्ट कळविलें पाहिजे.

सरदार–होय. धर्माविरुद्ध गोष्ट कोणती हें मुग्ध ठेवून उपयोगी नाहीं. त्यांतून मंडळी बरीच त्या बाजूची झाली आहे असें ऐकिवांत आहे.

रामभटजी–ऐकिवांत कां प्रत्यक्ष विवाहास जाऊन, दक्षिणा घेऊन, वधूवरास आशीर्वाद करून, मंडळी आली आहे. याहून आणखी बाजूचें होणें तें काय राहिलें?

सरदार–काळ उलट झाला आहे खरा. आपला उपाय असेल तितका करून पाहावा. मलातर यांत यश येईल असें दिसत नाहीं.

पेनशनर–अहो यशापयशाचें वेळेपूर्वींच जर तुह्मी पाठ फिरवूं लागला तर तुह्माला यश येणार कसें? बरें आपला विचार ठरला तोंडीं मजकूर कळविण्याचा मग उशीर कशाला? हा मी जातों घरीं. आणि पाठवितों बोलावणें-कऱ्यास एकंदर ग्रामस्थांकडे कोठें आहेरे जानू?

जानू–जी महाराज.

पेन्शनर–चल मजबरोबर. बोलावणेंकऱ्यास माझेकडे घेऊन ये घरीं. (रामभटजी व सरदार यांस नमस्कार करून निघून जातो.)

**सरदार**—मलाही घरीं जाण्यास परवानगी असावी.

**रामभटजी**—बरें आहे. माझीही स्नानाची वेळ झाली आहे.

( एकमेकांस नमस्कार करून जातात ).

---

## प्रवेश २ रा.

स्थळ-गुंडोपंताचें घर.

( गुंडोपंत मनाशीं विचार करीत बसले आहेत ).

**चिंतोपंत**—(आंत येऊन) दरवाजावर कोण आहे?

**रामा**—मी आहे. आपल्याला जावयाचें आहे भेटीकरितां? मी कळवितों.

**चिंतोपंत**—कळीव.

**रामा**—( आंत जाऊन ) चिंतोपंत आले आहेत.

**गुंडोपंत**—बोलाव त्यांना आंत. मी त्यांचीच वाट पहात आहे.

**चिंतोपंत**—( नमस्कार करितो ) लग्न लागून जिकडील तिकडे सर्व व्यवस्था झाली. हें आपणास विदित आहेच. आतां बहिष्काराबद्दल ग्रामस्थांची सभा होणें आहे उदयीक. तेव्हां पेनशनराकडे जातों, आपल्या आज्ञेप्रमाणें आणि करतों तजविज. पहातों काय होतें तें.

**गुंडोपंत**—बरें आहे, लवकर या. ( नमस्कार करून निघून जातो. ) ( स्वगत ) चिंतोपंत तर आपल्या कामाविषयीं सावध आहे. मी जो दुसरा मनुष्य सरदाराची गांठ घेण्यासाठीं पाठविला होता त्याचे वर्तमान कांहीं कळलें नाहीं.

**गोसावी**—( आंत येऊन ) अरे द्वारपाला, मालकांस कळीव कीं एक गोसावी भेटीसाठीं आला आहे.

**रामा**—बरे, उभा राहा. ( आंत जाऊन ) एक गोसावी बाहेर आला आहे व तो आपली भेट घेऊं इच्छित आहे.

**गुंडोपंत**—( स्वगत ) मी त्यांचेंच स्मरण केलें होतें. बरें झालें. ( उघड ) येऊं दे त्यांना आंत.

**रामा**—या असे इकडे. ( गोसावी आंत जातो ).

**गोसावी**— ( नमस्कार करून बसतो. ) आपल्या आज्ञेप्रमाणें सरदारांच्या गांठी घेतल्या, सख्य जोडलें आहे, भांगेचा अभ्यास चालला आहे. उद्यां जरा कैफ जास्त घातला कीं ग्रामण्याच्या सभेच्या वेळेस तमाशा बघावयाला नको.

**गुंडोपंत**—गोविंदराव, बरें सांग कसा काय तू त्यांच्यायेथें प्रवेश केलास ?

**गोविंदराव**—ऐका महाराज, या गोसाव्याच्या वेषानें सरदारांची घेतली गांठ, त्यांना सांगितला भांगेचा महिमा

त्यांना मुलगा नाहीं हें आपल्याला ठाऊक आहेच, तेव्हां भांगेचें सेवन शंकराच्या आराधनेंसह केलें ह्मणजे पुत्र-प्राप्ति होईल ह्मणून पुस्तकाचे आधारानें सांगितलें. स्वारी झाली खुष. आह्मांला रोज येण्याविषयीं केला हुकूम. त्या-प्रमाणें आज पंधरा दिवस जात असतों. उद्यांच काम झालें ह्मणजे गोसावी जाईल निघून आपल्या कामास. पुन्हा कशाला भेटतो आहे त्यांस?

**गुंडोपंत**—वः एकूण इच्छिल्याप्रमाणें सर्व गोष्टी घडत आहेत बरें आहे. गोविंदराव, तुझे कामांत तुला यश येवो! हा माझा मित्र चंद्रशेखर यास या गांवांत कोणीही नांव ठेवूं नये अशी व्यवस्था झाली ह्मणजे सुरवात केलेलें कार्य तडीस गेलें ह्मणावयाचें. आतां जा तुह्मी आपले कामास.

( गोसावी आशीर्वाद करून निघून जातो ).

**गुंडोपंत**—दोन गोष्टींची हकीगत तर कळली. तिसरे कामाची व्यवस्था कशी काय झाली आहे ते अजून समजलें नाहीं.

**रामा**—महाराज, आपाशास्त्री आले आहेत.

**गुंडोपंत**—बरें आहे, येऊंदे. मला तेच पाहिजे होते यावयास.

**रामा**—आपण चलावें आंत.

**आपाशास्त्री**—( आंत येऊन नमस्कार करितो. ) उद्या लग्नांत मुलाचे बापाकडून पैसा पाठविण्यासाठीं जामीय

रामभट झाले होते. त्यांतील मुलीचा बाप सांवळाराम या गांवांत नव्हता, तो आज आला आहे. त्यास जाऊन कळविलें कीं, तूं आपले राहिलेल्या रुपयांचा तगादा जामिनाजवळ कर; आणि नाहीं दिले तर फिर्याद करण्याचे तयारीस लागतों, असें सांग. शिवाय असें सांग कीं, ग्रामण्याचे सभेमध्यें ही गोष्ट आह्मी उघडकीस आणूं कीं, शास्त्राज्ञेचा भंग मुलीचा विक्रय करविल्यानें आपणच करतां. तो तिकडे तसें सांगण्यासाठीं जाणार आहे.

**गुंडोपंत**—तुह्मांस ही ग्रामण्याची सभा लवकर होणार ही बातमी कोणाकडून आणि केव्हां समजली?

**आपाशास्त्री**—आपल्या आज्ञेप्रमाणें चिंतोपंतांनीं सर्व बोलावणेंकऱ्यांस पांच पाच रुपये देऊन ही बातमी आह्मांस एकदम कळवावी ह्मणून सांगितलें होतें; शिवाय पेनशनरांचा शिपाई जानू यासही अशाच प्रकारें तयार करून ठेविला होता; त्याचेकडून क्षणाचा अवधी न होतां आह्मांस ही गोष्ट समजली. जशी योजना महाराजांची; त्यांत कांहीं कमी पडण्याचें चिन्ह दिसत नाहीं. जी गोष्ट ज्या तऱ्हेनें करावयाची त्या तऱ्हेनें अजूनपर्यंत होत आहे. आपला उद्योग आणि आपलें लोकांतलें वजन तसेंच आहे.

**गुंडोपंत**—चंद्रशेखराची हुशारी आणि विनय यांजकडे सर्व श्रेय आहे. नुसता माझा उद्योग असून काय उपयोगाचा होता? शिवाय तुमच्यासारख्या मंडळींचें सहाय्य. हें

काय कमी महत्वाचें आहे? कारणसमुच्चय सर्व जुळला पाहिजे, ह्मणजे कार्य होत असतें. बरें आहे. रामभटजी घरीं काय ह्मणतात, सभेंत काय होतें त्याचा शोध ठेवावा आणि मी न आलों तर कळवा.

( आपाशास्त्री आज्ञा घेऊन निघून जातो. )

---

## प्रवेश ३ रा.

स्थळ-पेनशनरांचे गृह.

( पेनशनर बसले आहेत. )

**पेनशनर**-( स्वगत ) आमच्यासारखीं जुनी खोडें अजून जिवंत असून विधवा विवाहाच्या गमज्या लावल्या आहेत. बरें पाहातों आतां उदयीक सभेंत बहिष्कार निश्चित झाल्यानंतर ही मंडळी येथें कशी सुखानें राहाते ती! सरदार बाळासाहेबांत कांहीं विशेष पाणी राहिलें नाहीं, परंतु या स्वारीची कोठें तरतरी कमी झाली आहे! ( पडद्याकडे लक्ष देऊन गडबड ऐकून ) आं! ही गडबड कसली आहे, लोक काय जमले आहेत आणि पोलीस कशाला, आणि नेतात कोणाला चावडीकडे! कोण आहे शिपाई?

**जानू**-जी महाराज.

**पेनशनर**–अरे, ही कसली गडबड आहे पहा जाऊन.

**जानू**–एक आवा गर्भ घेऊन जात होती तिला पोलिसांनीं चावडीकडे चालविली आहे तपासाकरितां.त्याजकरितां लोक जमा झाले आहेत ते चालले आहेत? तिकडे तिच्यामागोमाग.

**पेनशनर**–( मनांत विचार करून ) ( स्वगत ) आं! हें काय खटलें? आमच्या ओळखीच्या पात्राचें तर नव्हेना? तिच्या गर्भपाताच्या पाळतीवर लोक होते खरे. बरें कांहीं चिंता नाहीं. (उघड) पहा, कोण बाई होती ती पुढें जाऊन.

**जानू**–जी हा निघालों.

**पेनशनर**–( स्वगत ) ती जर गोष्ट उघडकीला येईल तर मग मात्र येथें राहणेंसुद्धां उपयोगी नाहीं. मग सभा कशाची आणि बहिष्कार कशाचे. बरें, पहावें. प्रथमच धीर सोडूं नये.

**जानू**–मैनाबाई ह्मणून कोणी सुईण आहे तिला घेऊन गेले आहेत.

**पेनशनर**–ही सुईण तर तीच. आपले ओळखीचे बाईकडे पाठविली होती. बरें पण त्याच बाईकडे गेली होती असें कशावरून! दुसरे कोणाचा गर्भ नसेल कशावरून! (उधड) गर्भ कोणच्या बाईचा हें कांहीं विचारलेंस?

**जानू**–होय, आपल्यायेथें कधीं कधीं येतात, कमळजाबाई त्यांचा; असें ऐकलें.

**पेनशनर**–( मनांत आलेली भीति बाहेर न दाखवितां ) बरें, फौजदार साहेबांना इकडे मी बोलाविलें आहे ह्मणून सांगून ये. जा कसा लवकर.

**जानू**–जी महाराज निघालों.

**पेनशनर**–हें सर्व खटलें तर आपल्या आंगावर येतेंसें दिसत आहे. फौजदार साहेबांची समजूत घालून आपण निघून जावें. आपल्यावरचें संकट जाईतों आपण कशाला लोकांवर संकट आणण्याच्या नादीं लागावें.

**चिंतोपंत**–घरांत यजमान आहेत का?

**पेनशनर**–चिंतोपंत, यावें. आमचा शिपाई कामाला बाहेर गेला आहे. आपण यावें आंत.

**चिंतोपंत**–(आंत येऊन) आतां कांहीं गडबड ऐकली रस्त्यांत, ह्मणून ह्मटलें शोध करावा कांहीं आपल्यास ठाऊक असल्यास. कशाबद्दल गडबड आहे ती?

**पेनशनर**–मला कांहीं पुरतें ठाऊक नाहीं परंतु कांहीं गर्भपाताची वदंता आहे.

**चिंतोपंत**--कोणा विधवाबाईचा कीं काय?

**पेनशनर**–असें ऐकतों.

**चिंतोपंत**–आपलें नांव त्यांत गुंतलें आहे असें लोक बोलत होते. हें कसें?

**पेनशनर**--अहो, लोकांचें तोंड कोणीं धरावें? मलातर इतका या गांवचा कंटाळा आला आहे कीं हा गांव देखील नको.

**चिंतोपंत** ( स्वगत ) ही पीडा कदाचित जाईल तर गर्भपाताचे खटले तरी कमी होतील. ( उघड ) अहो आपला हेतु आहे जुन्या चाली कायम ठेवण्याचा पण काल आहे नव्या चालीचा तेव्हां आपले हेतु कसे लोकांस पटावे.

**पेनशनर**–पहा ही ग्रामण्याची सभा उदयीक आहे पण त्यावर देखील पाणी सोडण्याचा प्रसंग येतो आहेसें दिसतें.

**चिंतोपंत**–आपण राहाणें मला तर बरें दिसत नाहीं.

**पेनशनर**–आतां मी राहात नाहीं हेंच खरें. तें ग्रामण्य सिद्धीस जावो अगर न जावो.

**चिंतोपंत**–( मनांत ) आम्ही त्याकरितांच हें खटलें उघडकीस आणलें आहे ( उघड ) आपला विचार अगदीं पोक्त आहे. त्याप्रमाणेंच करावें. मी उदयीक भेटेन, मला सवड झाली तर. आतां रजा घेतों.

**पेनशनर**–बरें आहे यावें. यावरून तर आपल्याला अधिकच संशय येतो कीं हें कृत्य मुद्दाम खटपट करून उघडकीस आणलें आहे. बरें कांहीं चिंता नाहीं. फौजदार जों पर्यंत अनुकूल आहे तोंपर्यंत कांहीं हरकत नाहीं.

जानू–आज्ञा असेल तर मी विनंती करीन.

पेनशनर–काय झालें तिकडील कामाबद्दल?

जानू–मी सांगून आलों. ते ह्मणाले मी आलोंच.

पेनशनर–फौजदार साहेब का?

जानू–जी महाराज. हे आलेच पाठोपाठ.

पेनशनर–बरें आहे,आलें कीं बोलाव आंत.

जानू–जी महाराज.

पेनशनर–(स्वगत) अशीं खटलीं पूर्वीं दोन चार झालीं; परंतु त्याबद्दल कोठे बोभाटा झाला नाहीं. याच खटल्याचा इतका बोभाटा झाला याचें कारण हे नवीन झालेलें लग्न तर नव्हे? चंद्रशेखर स्वतः इतका उद्योग करून कोणाच्या नुकसानीला कारण होईल असा त्याचा स्वभाव दिसत नाहीं. गुंडोपंताचें काम ह्मणावें तर त्याचा प्रत्यक्ष संबंध या कामांत नाहीं. दुसरा कोणी मोठा मनुष्य दिसत नाहीं. सुईण आणि बाई यातर स्वतः गुन्हेगार; तेव्हां त्यांच्याकडून बोभाटा व्हावयाचा नाहीं. फौजदार आमचा स्नेही, तोहोऊन आमचे पाठीमागे लागेल असे नाहीं तरी ही ढवळाढवळ कोणी केली आहे याचें खरें अनुमान होऊं शकत नाहीं; परंतु फौजदाराकडून माहिती मिळाल्यानंतर जास्ती तर्क चालवितां येईल; न आला तरी आपल्याला या गांवीं फार दिवस राहणें नाहीं हें ठरलें. निदान हा

बोभाटा जिकडच्यातिकडे मिटला तरी पाहिजे; तोंपर्यंत येथें राहणें प्रशस्त नाहीं.

**ज्ञानू**–फौजदारसाहेब आले आहेत.

**पेनशनर**–येऊं दे. त्यांच्याकारितांच वाट पहात आहें.

**फौजदार**–( आंत येऊन रामराम करून बसतो. ) आतां ही चवकशी पुरी करून आलों. आपल्या नांवाचा बोभाटा जिकडे तिकडे निनांवी अर्जांनीं केला असल्यामुळें माझा चौकशी केल्यावांचून इलाज चालेना.

**पेनशनर**–( खिशांतून नोट काढून फौजदार साहेबांचे हातांत देऊन ) ही तुमची बक्षिसी समजलांत? आतां पुढलें तुह्मास ठाऊक आहेच, काय करावयाचें तें.

**फौजदार**–( नोट घेऊन ) अहो मी काय असल्या निनांवीं अर्जांना दाद देतों आहे. शाबिती नाहीं ह्मणून लांबलचक रिपोर्ट केला ह्मणजे झालें. शिवाय आपण येथें न राहिला तर कांहीं अंशीं काम हलकें पडेल, असा अदमास वाटतो. आपल्यावर कांहीं खटला होत नाहीं. पण बदलौकिक होतो, तो आपण समक्ष पहावयास कशास पाहिजे?

**पेनशनर**–आपली सल्ला मला अगदीं बरोबर वाटते. माझ्या मनांत तसेंच होतें; परंतु आपला अभिप्राय पाहून नंतर काय तें करावें अशा विचारांत होतों. आपला अभिप्राय कळला; झालों संशयांतून मोकळा.

फौजदार–( मिळालेली नोट खिशांत घालून ) बरें आहे, आपण कांहीं काळजी करूं नये. ( रामराम करितो व निघून जातो. ) ( जातांना समाजाकडे पाहून ) अशी दोन चार कुळें असलीं ह्मणजे फौजदार साहेबाला बक्षिसीला कांहीं तोटा नाहीं. “ द्रव्येण सर्वे वशाः ” आपण काय करावें.

---

## प्रवेश ४ था.

स्थळ–बाळासाहेबांचें घर.

( पडदा उघडतांना सरदार बसलेले दिसतात. )

**गोसावी**--काय, सरदार काय करताहेत? ह्मणावें गोसावी आला आहे.

**रामा**–जी होय. ( आंत जाऊन ) आपल्याकडे पंधरा रोज गोसावी येत असतात ते आले आहेत.

**सरदार**–येऊं दे त्यास.

**गोसावी**–आज जरा मासलेदार बुट्टी आणली आहे; सरदारानीं पहावी मजा कशी येते ती.

**सरदार**–तुमच्या ह्मणण्यामध्यें विश्वास पटला आहे खरा. तुमची जी काय बुट्टी तयार व्हावयाची असेल ती होऊं दे; अनमान नको. आणरे पाणी वगैरे सामान; दे बोवाला.

शिष्य–( पाणी फडके वगैरे आणून ठेवतो. ) बोवा तयार करितो आणि गीत ह्मणतो.

पद.

जगदंबा ही मायारूपी पूर्ण करी मनकामना ।
आधिव्याधी समस्त हरुनि सोडवी सर्व कुवासना ॥
हरितवस्त्र परिधान करुनियां भक्तां दे आशीर्वचना ।
जे सद्भावें होती तत्पर जगदंबेच्या सेवना ॥ १ ॥

जाता मंदर मंथनाज्जलनिधौ पीयुष रूपा पुरा ।
त्रैलोक्ये विजयप्रदेति विजया श्रीदेवराजप्रिया ॥
लोकानां हितकाम्यया क्षितितले प्राप्ता नरैः कामदा ।
सर्वातंकविनाशहर्षजननी यैः सेविता सर्वदा ॥

याला इंद्राशनही नांव आहे. आणि ही वल्ली अथर्व वेदापासून प्राप्त झालेली आहे. ( सर्वजण पितात, परंतु सरदार जरा अधीक पेला झोकतात. )

**गोसावी**–आपले इच्छित मनोरथ जगदंबा कधीं पूर्ण केल्याशिवाय राहाणार नाहीं.

**सरदार**–बरें, पण आज एके ठिकाणीं ग्रामस्थांची सभा आहे तेथें बुद्धीनें कांहीं अप्रयोजकपणा तर होणार नाहींना?

**गोसावी**–छे, ही तर बुद्धि वाढविते, एका अर्थाचे दहा अर्थ डोक्यांत येतात, बुद्धि संग्रामांत ही जशी तरवारच आहे, हिच्यायोगानें हव्या त्या शत्रूचा पराजय

करण्यास उशीर लागत नाहीं. आपण खुशाल जावें सभेला. आपल्या कल्पना पाहून लोक चकित होतील असेंच या वल्लीचें सामर्थ्य आहे. मी आतां जातों.

## प्रवेश ५ वा.

### स्थळ-रामभटाचें घर.

(रामभट व सावळाराम बसले आहेत.)

**सावळाराम**—आमच्या पैशाची लवकर योजना झाली तर बरे, नाहीं तर आह्माला आपल्यावर दावा करणें भाग पडेल. आह्मी गरीब मनुष्यानीं किती दिवस वाट पहावी? आपल्यासारखा जामीन झाला ह्मणून आम्ही कार्य होऊं दिलें; नाहीं तर आधींच सर्व रक्कम घेतली असती. मुख्य मालक तो गांवांत हजर नाहीं, आम्ही वाट पहावी किती दिवस! रक्कम मिळेल याचा भरंवसा काय? सहा महिने होऊन गेले आणखी वाट पहावी किती दिवस?

**रामभटजी**—अहो, आजच काय गरज निघाली आहे. मालक येऊं दे, मग पाहूं. कोठें आहेत ते आपाशास्त्री? त्यांची आपण गांठ घेतलीत का?

**सावळाराम**—होय, ते आतां आपलेकडे येणार आहेत; त्यांनींच मला सांगितलें कीं, तुह्मी आपली रक्कम फार दिवस ठेवूं नका.

**रामभटजी**–मिळून जे आमच्या बाजूनें बोलतील ह्मणून आह्माला वाटत होतें त्यांनींच तुह्माला उठविलें आहे ह्मणावयाचें.

**सावळाराम**–त्यांना काय प्राप्ती आहे त्यापासून? परंतु त्यानीं आपलें आह्मांस सांगावयाचें तें सांगितलें. आपण करणार शास्त्रमर्यादा भंगाचीं प्रामण्यें. आणि आपण स्वतः करणार असल्याच शास्त्रनिषिद्ध कृत्यासंबंधी जामीनकी. तेव्हा संशय येतो कीं, रक्कम बुडाली तर काय करावें? (दरवाजाकडे पाहून) हे आपाशास्त्री आले; या शास्त्रीबुवा.

**रामभटजी**–यावें, यावें, असे बसा. (शास्त्रीबुवा बसतात) आपण यांची कांहीं समजूत करावी ते दिलें सोडून आणि त्यांना आपणच तगादा करण्यास लावितां हें काय?

**आपाशास्त्री**–त्यांना पडली आहे गरज रकमेची, दिवस झाले फार, ह्मणून आपलें रीतिप्रमाणें सांगितलें. त्यांनीं दम धरला तर आमचें काय?

**सावळाराम**–आह्मी नाहीं अधिक वाट पहात. आमची रक्कम पटली पाहिजे, नाहीं तर आपण आजच्या सभेचा प्रामाध्यक्षपणा सोडला पाहिजे.

**रामभटजी**–(स्वगत) रक्कम आणावी कोठून? आणि प्रामाध्यक्षपणा सोडावा कसा! (उघड) बरें आहे, जर

तजविज झाली तर पाहातों पैशाची. नाहीं तर आम्ही सभेचा नाद सोडला.

**सावळाराम**—बरें आहे, (नमस्कार करून निघून जातो.)

**आपाशास्त्री**—आपण तरी या सभेविषयीं इतका आग्रह धरण्याचें काय प्रयोजन?

**रामभटजी**—धर्मशास्त्रांत दोष ह्मणून मानिले आहेत त्यासंबंधी सभेंत ग्रामाध्यक्षानें पुढारीपणा न केला तर कोणी करावयाचा!

**आपाशास्त्री**—केवळ शास्त्रदृष्टीनें निर्वाह कोठें होतो? अलीकडे अलीकडे विधवाविवाहासंबंधानें अनुकूल मत बरेंच वाढलें असल्यामुळें आतां त्यासंबंधी दोष बहुत मानला जात नाहीं, आणि शास्त्रदेखील त्यासंबंधानें पाहिलें असतां वास्तविक अनुकूल आहे; परंतु कलिमार्ग ह्मणून मुद्दाम स्थापन केला आणि त्यांत जर त्याला प्रतिकूल वचनें लिहिलीं तर शास्त्रानें करावें काय?

**रामभट**—तसें एकदां स्पष्ट ठरलें ह्मणजे झालें. आह्मांला तरी नित्य शास्त्रार्थाची खटपट करावयाला नको.

(रामभटाचा मुलगा कृष्णराव येतो.)

**आपाशास्त्री**—या कृष्णराव, कशी काय खबरबात?

**कृष्णराव**—पोलिसाकडे एक गर्भपाताची चौकशी चालू आहे. त्यांत आपल्या पेनशनरांचें नांव दोष घडविण्याला उत्तेजन दिलें ह्मणून निघाल्याचें ऐकिलें.

**आपाशास्त्री**—असलीं कृष्णकृत्यें करविणाऱ्यांच्या बहिष्कारसभेला यश यावें कसें? आणि त्यांच्यासारखें मत द्यावें कोणी? आपली मौज पहावयास आह्मासारख्यांस जाण्यास हरकत नाहीं. आपण जाणें योग्य नाहीं. गेलांच तर ग्रामण्याविषयीं आग्रह धरूं नये. याचा विचार आपण करावा. मीं जातों. ( नमस्कार करून निघून जातो. )

**रामभट**—ही बातमी तुला कोणी कळविली?

**कृष्णराव**—सगळ्या गांवांत झाली आहे. ती कांहीं एका दोघांला ठाऊक आहे असें थोडेंच आहे?

**रामभट**—पेनशनरांवर असा आरोप आला तर असंभवनीय गोष्ट आहे असें नाहीं.

( रामभटजींचें कुटुंब जानकीबाई बाहेर येते. )

**जानकीबाई**—बायकांमध्येंसुद्धां या गोष्टीचा बोभाट झाला आहे. तरण्या बायकांचें पुनर्विवाह झाले तर पुरुषांचें काय विघडतें गर्भपातापेक्षां ते बरें नव्हत का? पुरुषांची आणि बायकांची सर्व प्रकारांनीं जरी बरोबरी नाहीं, तरी तारुण्याचे धर्म सारखे आहेत. पुरुषांसारख्या त्या पैसे मिळवित नाहींत, लग्न झालें ह्मणजे त्या आपल्याच घरीं राहूं शकत नाहींत, तरी पंचबाणाची बाव जशी पुरुषांना तशी बायकांना. त्याचा विचार करण्याचें सोडून बायकांच्या वैधव्यस्थितीवर तेवढे जालीम उपाय काढून ठेविले आहेत. एक तर मृतनवऱ्याबरोबर अग्नींत

उडी घालण्यास सांगावयाचें, किंवा संसारांतील लक्ष काढून देवाधर्माकडे लक्ष लाविण्यास सांगावयाचें, किंवा दुसऱ्यांच्या मुलांचे कष्ट करण्यांत आयुष्य घालविण्यास सांगावयाचें. परंतु सरळ मार्गानें कोणी लग्न करूं लागेल तर त्याच्याशीं द्वेष. जर लग्नावांचून लग्नफल आलें तर अनाथाश्रमांत जावें; पण सरळ मार्गाची बंदी.

**कृष्णराव**—आई आणखी एक कोटी काढतात ती तूं ऐकिली नाहींस वाटतें?

**जानकीबाई**—ती कोणती? आम्ही कशानें ऐकतों? का आह्मी वादांत जातो, कां सभेंत जातों? कोठें छापलेलीं पुस्तकें, पत्रें किंवा बायकाबायकांच्या बोलण्यांत समजतील त्या गोष्टी आह्मांला माहीत. पुरुषांच्या बोलण्यांतील कोट्या आणि कल्पना आह्माला काय समजतात?

**कृष्णराव**—एक एकदां लग्न केलें मग ज्याच्या नशीबानें जसें झालें तसें झालें. पुनःपुन्हा कोणी लग्नें करावींत? असें कित्यकांचें ह्मणणें आहे. परंतु एकाद्या विधवेशीं लग्न करणारा कोणी भेटला तर त्याच्याशीं हे लोक भांडण्याला कां उभे राहातात? हें सांगत नाहींत. विधवाविवाह सशास्त्र मानण्यांत पुनः पुनः लग्न करण्याचें भाग कोणासच पडत नाहीं. परंतु भाग पडतें किंवा पडेल अशी कल्पना करून वाकूछल करण्याला प्रवृत्त होतात; पण हीच कोटी पुरुषांचे बाजूनें पुढें कोणी आणित नाहीं.

**जानकीबाई**–इतिहासान्तरींदेखील स्त्रियांचे पुनर्विवाह झालेले आहेत, मग कलियुगांत आणि हिंदू लोकांतच तेवढे हे बंद कसे होतात? याचें काय कारण असेल तें असो.

**रामभटजी**–आह्मांला दुसऱ्या जातीचा विचार करून काय करावयाचें? दुसरी जात आमचे शास्त्र तयार करते कीं काय?

**कृष्णराव**–सती कशी बंद झाली? दुसऱ्या जातीनें केली, कीं आमची आम्हीं केली? विधवाविवाहासंबंधानें मिळकतिचा कायदा कोणी केला? आह्मी केला कीं लोकांनीं? अकबर बादशहानेंदेखील अशीच आमच्या धर्मासंबंधानें दुरुस्ती केली होती. ती कशी खपली?

**रामभटजी**–हल्लींच्या काळांत जुन्या मार्गाला अवकाशच राहिला नाहीं. मग तुह्मी जें बोलतां तें खोटें कां ह्मणावें! तुमचे पडले स्नेह नव्या मंडळीशीं. आमचे असने तर आह्मांला देखील असेंच बोलावें लागतें. परंतु याचा निर्णय दुपारच्या सभेंत लागतोच आहे. कशाला आतां त्याची विशेष चर्चा पाहिजे? सभेला अगदीं न जाणें कांहीं बरें नाहीं. परंतु आपण आग्रह धरणार नाहीं मग जसा निकाल लागणें असेल तसा लागेल. ( सर्वजण निघून जातात. )

# अंक ५ वा.

## प्रवेश १ ला.

स्थळ-गुण्डोपंताचें घर.

**गुंडोपंत**–( स्वगत ) सर्व व्यवस्था इच्छिल्याप्रमाणें घडत आहेत. शाबास गोविंदराव, शाबास चिंतोपंत, शाबास आपाशास्त्री, याला ह्मणावें स्नेही, याला ह्मणावें हुशारी, याला ह्मणावी तत्परता, काल अनुकूल हा सर्व पाहिजेच; त्यावांचून कांहीं होतच नाहीं. परमेश्वराचें जें अविज्ञेय रूप त्याचें एक दिग्दर्शन हा काल आहे. हा जेव्हां अनुकूल असेल तेव्हां प्रयत्न यशस्वी होतात. प्रतिकूल झाला कीं सर्व भगीरथ यत्न निष्फल होऊं लागतात. काल ही कर्तृ कोटींतील वस्तु नव्हे खरी, परंतु फलसिद्धिसाठीं लागणारा जो सूक्ष्मकारण समूह तो याच्या गर्भांत आहे, यासाठीं जोंपर्यंत मनुष्याला या समूहावर सत्ता मिळाली नाहीं तोंपर्यंत याचें प्रयत्नफल सर्व कालाधीन रहातें, आणि हा काल अनुकूल झाला ह्मणून विशेष आंनद होत असतो. तसा कांहीं या कामांत परमेश्वरकृपेचा योग दिसत आहे. आमचा मित्र चंद्रशेखर ह्मणा, अगर त्याची स्त्री सगुणाबाई ह्मणा, कोणाचा कां दैवयोग होईना पण आहे खरा. ग्रामण्याचे बाजूकडील बल पुष्कळ कमी झालें

आहे, पेन्शनर कोठें निघून गेले आहेत, सरदार योगमायेच्या आराधनेंत आहेत, रामभटजी बहुतेक इकडील झाल्यासारखे आहेत, आमचेकडील शास्त्रीमंडळ सर्व तयार या बाजूचें प्रतिपादन करण्याकरितां पाहूं दे आतां पूर्वीसारखी फितवाफितवी कशी करितात ती. सगुणाबाईच्या सांगण्यावरून नीलकंठस्वामीला देखील बोलाविलें आहे. ते इतक्यांत यावेत असा तर्क आहे.

**रामा गडी**–सभेकडील मंडळी जुळत चालली आहे म्हणून आपाशास्त्री याणीं सांगून पाठविलें आहे.

**गुंडोपंत**–त्याला कळीव कीं आम्ही तयार आहों येण्यास. सुरवात होऊं दे.

---

## प्रवेश २ रा.

### स्थळ-रामाचें देउळ.

(**एक बाजूस**–रामभट, कृष्णंभट, शेंडेशास्त्री, भोंडेशास्त्री घमंडेशास्त्री व इतर, **दुसरे बाजूस**–सावळाराम, आपाशास्त्री गोसावी चिंतोपंत व इतर. **मध्यें**–सरदार बाळासाहेब, गुंडोपंत, नीलकंठस्वामी व इतर.)

**व्यवस्थापक**–( पुढें येऊन ) जाहीर पत्रकांत ठरविलेल्या वेळेप्रमाणें येणारी मंडळी बहुतेक आली आहे, पेन्शनर नानासाहेब येथें नसल्याचें कळल्यावरून अधिक

तपास केला नाहीं, चंद्रशेखररावांचा येण्याचा मानस दिसला नाहीं; आले तर कांहीं वेळानें येतील असें समजतें. यासाठीं ग्रामस्थांस जो विचार करणें असेल त्यास सुरवात करण्यास हरकत नाहीं. जाहीर पत्रकांत लिहिलें आहें कीं, आपल्या गांवांत चंद्रशेखरराव याणीं वडगांवकर इनामदार नानासाहेब यांचें गतभर्तृका सुनेशीं विवाह केला आहे, ही गोष्ट सर्वांस विदित झालीच आहे. असे विवाह वादांतीं सुमारें आज चाळीस वर्षे अशास्त्र ठरले आहेत. तेव्हां जातीनें त्यांस अपंक्त करण्याचा ठराव करणें.

**गुंडोपंत**--एका पिढीपेक्षां अधिक मुदतीच्यामागें जो निर्णय झाला त्याचें आज कोणास विशेष ठाऊक नाहीं व या गोष्टीचें पुनरालोचन होऊन जरूर ती दुरुस्ती व्हावी असें बहुत गृहस्थ लोकांस वाटत आहे, सबब मागील वादाची हकीकत कळल्यास ह्याबद्दल आह्माला काय बोलणें ते बोलूं. त्यानंतर मंडळीच्यामतें जो ठराव होईल तो जाहीर करतां येईल.

**बाळासाहेब**–( भांगेच्या गुंगींत ) ठराव आदिप्रभुशंकरानींच केला आहे. कीं इच्यायोगें समस्त आधिव्याधिपासून मनुष्य मुक्त होतो. ( सर्व हंसतात. )

**रामभटजी**–सभेच्या कामास कोणी तरी मुख्य स्थानीं बसवावें म्हणजे त्याचे आज्ञेप्रमाणें विचार करूं.

**बाळासाहेब**—आज्ञा शंकराची आहेच मग आणखी कोणाची आज्ञा पाहिजे ? (सर्व हंसतात. )

**आपाशास्त्री**—येथें काम चाललें आहे शास्त्रार्थासंबंधी आपण शंकराची आज्ञा आणि ठराव कशाबद्दल काढले आहेत ?

**बाळासाहेब**—शंकरासारखें शुभदैवत नाहीं आणि विजयेसारखी वल्ली नाहीं ( जोरानें ) नाहीं हें खास.

**आपाशास्त्री**—हा अभ्यास गोसावीबोवानीं करविला असेल ( रामभटजीकडे पाहून ) प्रमुखस्थानाचा प्रश्न तसाच राहिला. आपणच स्वीकारावें तें. ( सरदार गुंगी येऊन पडतात. )

**रामभटजी**—(स्वगत) कन्याविक्रयाचा दोष आमचेवर जाहीर करविण्याची यांचीच तजवीज आणि अध्यक्ष स्थापनाचा आग्रहही हेच करतात. म्हणजे एका शास्त्राज्ञेच्या भंगाचा दोष लोकावर घालावा तो दुसऱ्या आज्ञेच्या भंगाचा दोष आपणावर. ( उघड ) नको तो अधिकार आपणास ह्या स्थानायोग्य स्वामी असतांना इतरांस कशाला आग्रह करण्याचें मनांत आणावें.

**आपाशास्त्री**—होय स्वामीनी तें स्थान अलंकृत केल्यास आमची कांहींच तक्रार नाहीं.

**नीलकंठस्वामी**—आपली सर्वांची मर्जी असल्यास मला ईश्वर जी बुद्धि देईल त्या प्रमाणें मी काम करीन व मत देईन.

**गुंडोपंत**—स्वामींनीं मुख्य स्थान स्वीकारावें हेंच मला बरें दिसतें. ( स्वामी प्रमुख ठिकाणीं बसतात ) रामभटजीस माहिती असल्यास त्याणीं ज्या तत्वांवर पूर्वी पुनर्विवाह अशास्त्र ठरला तीं कळवावींत.

**रामभटजी**—प्रथमारंभीं गोष्ट अशी निघाली होती कीं, निषेधपर वाक्यें अधिक असून विधिपर वाक्यें थोडीं आहेत या साठीं एकवाक्यतेच्या दृष्टीनें निषेध ग्राह्य आणि विधि अशास्त्र.

दुसरी गोष्ट अशी होती कीं, जर विधि युक्त मानणेंच आहे, तर नियोगाज्ञेकरितां अगर सप्तपदी पूर्ण होण्यापूर्वीं प्रेत होणाऱ्या पतिच्या प्रसंगीं असा मानावा, म्हणजे तत्तन्मार्ग प्रतिपादक वचनाशीं मेळ राहून निषेध वाक्याशीं विरोध कमी येतो.

तिसरी गोष्ट अशी होती कीं, युगायुगाचे धर्म निराळे असल्या कारणानें व कलिनिषेध वाक्यें स्पष्ट असल्यानें जरी अन्य युगांत विधवा विवाह चालू असला, तरी कलियुगांत तो निषिद्ध समजावा. विधि पक्षाकडून असें प्रतिपादन करण्यांत आलें होतें कीं, विधिवाक्यांतील शद्बांची ओढानाण व त्यांतील अर्थ सौरस्याचा भंग करणें अश्लाघ्य आणि अप्रयोजक होतें, परंतु पंचा पैकीं एक दोन गृह

स्थानीं जरी भीत भीत आणि कष्टानें सरळ अर्थाची आणि सरळ कल्पनेची बाजू धरली तरी रूढींत फेर बदल करण्याची जबाबदारी त्यांस देखील मोठी भयंकर वाटली, ह्या वरून एकंदर निकाल विरुद्ध झाला.

**चिंतोपंत**–स्वामींची परवानगी असल्यास आज आपण याच विषयाचा एक वार पुनः विचार करून बहुमत काय आहे तें पाहूं; आणि स्वामींस निवेदन करूं ह्मणजे बदललेल्या पिढीला आणि बदललेल्या कालास योग्य असा नियम ठरवितां येईल, त्या खेरीज झालेल्या गोष्टीस केवळ अंधपरंपरेनें मान देणें लोक हितास विरुद्ध होतें.

**स्वामी**–मला वाटतें असें केल्या खेरीज नवीन पिढीनें आपलें कर्तव्य केलें नाहीं असा त्यांजवर दोष येईल, शिवाय रूढी ह्मणजे कालाकालानें बदलणारी जी लोक रीति त्यासच तें नांव आहे. या करितां त्याचा विचार जसा काल बदलेल तसतसा पुनः जहाला पाहिजे. शास्त्राचा विचार थोडासा गहन आहे खरा. परंतु त्यांत देखील जर मनुष्यानें आपल्या वाढत्या अनुभवाचा आणि माहितीचा उपयोग सारासार दृष्टीनें आणि नैतिक धैर्यानें केला नाहीं तर तें कुशास्त्र थोड्याच वेळांत समाजाच्या अपकर्षाला कारण होईल. यासाठीं रूढीचा तसा शास्त्राचाही फेरफार कालाकालानें आणि परिस्थिती प्रमाणें करणें अत्यंत जरूर आहे. आपल्या धर्म शास्त्रांतील कितीतरी नियमाची फेर पालट झाली आहे. कांहीं समाजाकडून, कांहीं सरकारी

कायद्यानीं, व कांहीं देशस्थितीवरून याचा विचार केला तर एक नियम सदा हितावह नसून त्यांत फेरबदल करणें हेंच मानव जातीस भूषण असून त्यास उत्कर्षप्रद होतें. समाजाकडून फेरपालट झाल्याचीं उदाहरणें सर्वांचे अनुभवांत आहेतच. इंग्रजी आदीकरून परकीय भाषांचें अभ्यास तसेंच वेदाध्ययनाचा लोप, हे बदल समाजाकडून घडले आहेत. सरकारी कायद्यानें सती जाण्याची चाल बंद झाली आहे, अशा इतरही दुष्ट चाली अनेक बंद झाल्या आहेत, रजपूत लोकांत लहान मुली मारण्याची चाल होती हें सर्व सरकारनें कायद्यानें व हुकमानें बंद केले आहेत. तिसरे फेर बदल जे देशस्थिती वरून होतात, ते बंगाल, मद्रास, व पंजाब यांतील निरनिराळ्या आचारांचा विचार केला ह्मणजे सहज लक्षांत येतील. किती एक प्रांतांत मत्स्याहार आहे, तर किती एकांत मांसाहारही आहे; कोणी भोजन कालीं शुचि वस्त्र परिधान करितात, तर कोणी करित नाहींत; कोणी शूद्रादिकांचा विटाळ मानितात तर कोणी मानीत नाहींत; इत्यादि अनेक भेद देशपरत्वें पडले आहेत.

विधवेच्या धर्माबद्दल पाहिलें तर कांहीं वचनें विवाह प्रतिपादक, तर कांहीं नियोग प्रतिपादक, कांहीं ब्रह्मचार्य प्रतिपादक, व कांहीं सहगमन प्रतिपादक असे चार भेद झाले आहेत. जर सहगमन कायद्यानें बंद झालें आहे, तर त्याचा विचार राहिलाच नाहीं. परंतु ज्या अर्थी असले क्रूर मार्ग शास्त्रांत दाखल झाले होते, त्या अर्थी आपणास

एक गोष्ट लवकर कळते कीं, शास्त्रशास्त्र ह्मणून जें गाजतें तें सर्वच चांगलें नसतें, तर त्यांत कुशास्त्रेंही असतात. कीं ज्यांचा जितका धिःकार करवेल तितका करणेंच योग्य होईल. बाकी राहिले विवाह नियोग, आणि ब्रह्मचर्य यांत देखील विवाहाच्या सरळ मार्गास फाटे फोडलेले आहेत. कोणी दत्ताअदत्ता कोणी क्रान्त सप्तपदा, अक्रांत सप्तपदा कोणी क्षता अक्षता, असे भेद काढून मुख्य गोष्ट जी पति मरणापत्ति ह्यास मागे टाकतात, व गौण भेद काढून तेवढ्या पुरते शास्त्राधार लिहितात इतक्या नानाप्रकारच्या शास्त्रांतून एकवाक्यतेचा प्रयत्न करणें ह्मणजे दहा जातीच्या फळांना एकच नांव शोधून काढणें यासारखे असंभवित आहे. सरळ मार्ग म्हटला म्हणजे आपत्तीच्या मुळाचा छेद जेणें करून होइल तो पाहणें हा आहे. प्रस्तावने सारख्या या ज्या मी आपणास गोष्टी सांगितल्या त्याकडे लक्ष देऊन कोणास काय बोलणें असेल तें बोलावें ह्मणजे बहुमत कसें आहे तें पाहूं.

**आपाशास्त्री**-आर्यांच्या मागील इतिहासा वरून एका कालीं स्त्रिया स्वैर वृत्तिनें रहात होत्या असें दिसतें. ही चाल नीति विरुद्ध दिसल्या वरून विवाह रीति सुरू झाली. महाभारत कालीं सत्यवती, कुन्ती, यांच्या इतिहासावरून नियोगाची रीति होती व उलूपी दिव्यायांच्या कथेवरून त्याच कालीं पुनर्विवाहाची ही रीति होती. असें दिसतें.

पुढें सहगमनाची क्रूर चाल पडली असावी, जशी पुरुषास पत्नीच्या मरणानंतर अन्य विवाह करण्याची मोकळीक आहे, तशीच स्त्रियांस त्यांची इच्छा असल्यास योग्य पति मिळाल्यास अन्य विवाह करण्याची मोकळीक असावी, हें योग्य दिसतें. तशी असल्यास वर्ण संकराची दारुण भीति कांहीं लोकांस वाटतें ती कां याचें कारण काहि कळत नाहीं. जी पहिल्या विवाहास मर्यादा तीच दुसऱ्यास असल्यावर वर्ण संकराची भीति निराधार होते. आजपर्यंत जे अनेक पुनर्विवाह झाले आहेत व होत आहेत, त्यांत विवाहाचे साधारण नियमांचें उल्लंघन झालें नसून वर्ण संकर झाल्याचें दिसत नाहीं असें असून या भीतीचें सोंग पुढें आणण्यांत केवळ बुद्धीचा कोतेपणा आणि अनुदारता मात्र उघड होतात. या साठीं मागें झालेला विरुद्ध निकाल फिरून पुनर्विवाहाचा राजमार्ग जो कायद्यानें आधींच मोकळा केलेला आहे तोच समाजाचे समतीनें कायम व्हावा असें झाल्यानें गर्भपातादिक दोष कमी होतील अगदीं बंद होतील असें जरी नाहीं तरी कमी होण्याचा मार्ग हाच आहे.

**रामभटजी**–मनु, नारद, वसिष्ट यांचे अनुमोदन पुनर्विवाहास आहे, ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. व अर्थ सौरस्य नाहींसें करून न्यायव्याकरणाच्या क्लिष्ट कल्पनानीं सरळ अर्थ फिरविणेंही मला पसंत नाहीं, परंतु

दत्ताकन्या नदीयते, इत्यादि वचनें अडचण आणितात त्यांचा आपण काय विचार केला आहेत?

**आपाशास्त्री**–त्याचा निकाल पूर्वींच झाला आहे, जर अक्रान्त सप्तपदा व अक्षत योनि कन्या पुनः दिली जाते तर इतर प्रसंगीं विधवा कां दिली जाऊं नये याचें कारण कांहीं दिसत नाहीं, गत भर्तृकाही कन्ये प्रमाणेंच समजली पाहिजे, न समजले तर मुख्य उपाय विवाह त्यास मर्यादा झाल्यानें पुनः नीतिमान् वर्तणुकीस अडथळा येईल. गौण अडचणीला महत्व देऊन मुख्य अडचण जशीच्या तशीच टेविल्यासारखें होतें तसें करणें समंजस पणाचें नाहीं. या साटीं कन्यात्व न राहिल्यानें अथवा एकवार दत्त असल्यानें पुनः दिली जाण्यास कांहीं हरकत राहात नाहीं.

**रामभटजी**–पौनर्भव संततीही नीच जातींत समजावी, अशा विषयीं वाक्यें आहेत, याचा आपण काय निर्णय करण्याचें योजिलें आहे

**आपाशास्त्री**–एक तर हा दोष सरकारी कायद्यानेंच वारसा संबंधानें दूर झाला आहे. दुसरे जर विधि वचनें स्पष्ट आहेत तर संततिला नीचपणा देणारी वाक्यें प्रक्षिप्त मानिलीं पाहिजेत, अगर त्याज्य समजली पाहिजेत. ऊदेचा ह्मणजे विवाहित स्त्रीचा सतरा प्रसंगीं पुनर्विवाह उपदिष्ट आहे. पुनर्विवाहित स्त्रीस अगर तिच्या संततीस गौण

पणा आला तर पुनर्विवाह उपादिष्ट असून उपयोग काय? येथें युगांतर धर्मा विषयीं थोडा विचार करणें जरूर आहे.

'ऊढायाः पुनरु द्वाहं' इत्यादि वचना वरून जरी पांच गोष्टी कलियुगांत करूं नयेत ह्मणून सांगितलें आहे, तरीं त्या पांच गोष्टी अन्य वचना वरून सारख्या राहत नाहींत, कोठें समुद्र यात्रिकाचा स्वीकार बंद केला आहे, दीर्घकाल ब्रह्मचर्याचाही निषेध केला आहे, 'अग्निहोत्रं गवालंभं संन्यासं पलपैतृकं' इत्यादी वचनांत अग्निहोत्र संन्यास मांसाहाराचें श्राद्ध वगैरे बंद केली आहेत परंतु अग्नि-होत्र सन्यास चालू असून समुद्र यात्रेचाही दोष निष्कृत होत आहे, असल्या अपवादात्मक परस्पर विरुद्ध व एक वाक्यता रहित वचनांचा नीटपणानें विचार करतां येणेंच अशक्य आहे. हल्लींच्या आणि ज्या कालीं हीं वाक्यें करण्यांत आलीं त्यांत अंतर फार झालें आहे सबब आपले शास्त्रार्थ हिताहिताच्या दृष्टीनेंच ठरविणें भाग आहे चांगले मार्ग कलियुगांत कां बंद करावेत याचें कारण समजणें कठिण आहे, चोरी न करणें हें जर एका युगांत मान्य होतें तर दुसऱ्या युगांत चोरी करणें मान्य होईल असा संभव नसून युगभेदानें धर्म भेदाची कल्पना योग्य कारणा वांचून सुज्ञांनी गृहीत करणें बरोबर होणार नाहीं अनुभवानें दोष नजरेस आले असले तर त्या दोषा-साठीं एकादी गोष्ट टाकणें ठीक होईल, परंतु दोष कोणते

आणि कसे याचा विचार शुद्ध बुद्धीनें झाला पाहिजे, तसे न होईल तर वाईट गोष्टी कायम राहाण्याचा संभव आहे आणि तसें झाल्यानें इतर समाजाचें मानानें आपण मागें राहून, उपहांसास पात्र होऊन, दास्यत्वाचे अधिकारी बनूं. फार काय पण ही स्थिति हल्ली जहालीच आहे असें समजल्यास चूक होणार नाहीं. निदान या पुढें निकृष्ट स्थितीचीच वृद्धि न व्हावी असें मनांत बाळगणारांनीं भावि धर्मऱ्हासाची समजूत टाकिली पाहिजे, अनुभवानें चांगल्या दिसून आलेल्या गोष्टीचा आश्रय केला पाहिजे, व निंद्य टाकिल्या पाहिजेत. पुनर्विवाहाची विधवांस मोकळीक ज्या समाजांत आहे त्या समाजांत कांहीं नुकसान झाल्याचें दिसत नाहीं. शास्त्राची संमति असून पूर्वीं रूढीही होती तर तीच मोकळीक हल्ली देण्यांत आली पाहिजे. आणि होईल तो ठराव मागील पुनर्विवाहास लागूं केला पाहिजे, ह्मणजे दोन प्रकार राहाणार नाहींत.

**गुंडोपंत**—आमचें सर्वांचें मत आपाशास्त्री यांचें ह्मणण्यास पूर्ण अनुकूल आहे.

**रामभटजी**—मला कांहीं विरुद्ध बोलण्याचें नाहीं. का शेंडेशास्त्री आपणास कांहीं बोलावयाचें आहे का?

**शेंडेशास्त्री**—अहो वितंड वाद केला तर पुष्कळ होईल परंतु धर्म न्याय किंवा व्यवहार या दृष्टीनें पाहिलें असतां विधवा विवाहाविरुद्ध बोलण्यासारखें काहींच नाहीं. शिवाय हल्लीं जो विवाह झाला आहे त्यांतील दोन्ही पात्रें ह्मणजे

आपले गावांतील दोन अति मान्य घराण्यातील, अति सद्वृत्त स्त्री पुरुष, अशा लग्नांत झालेला ब्राह्मण जातीचा मान संभावनाही पाहिली ह्मणजे यांत धर्मविरुद्ध ह्मणण्या सारखें कांहीं नाहीं. आतां या गोष्टीला मागील वादांत ठेविल्या प्रमाणें नावें ठेविल्यास जागा आहेत, कोणी यास एकदेशीय शास्त्र प्रतिपाद्य, कोणी आपद्विषयक, कोणी पुनर्भूत्वदोषावलिप्त विवाह ह्मणतात. व पतिचा अर्थ पालक, नाहीं तर नियोग पति, नाहीं तर अकृत सप्तपदी संस्कार विशिष्टपति, असा करितात; परंतु या सर्व विवरणांत प्रथमोपस्थित सरळ अर्थ व प्रकरणस्वारस्य राहत नाहीं असें मागील वादाचे वेळींच शास्त्री मंडळीचें मत होतें. सबब त्याच त्या कल्पना पुनः काढीत बसण्यांत काय अर्थ आहे?

**नीळकंठस्वामी**—बरें तर आपलें सर्वांचें मत जर विधवा विवाहास अनुकूल आहे तर तसें लिहून गांवागांव संमति मिळविण्यासाठीं पत्रें पाठवावींत.

**गुण्डोपंत**—तें काम मजकडे लागलें. येथें जमलेल्या मंडळीच्या सह्या मात्र येथल्या येथें मिळाव्यात ह्मणजे येथील काम आटपलें. ( कारकुनास हाक मारून ) दऊत, लेखणी, आणि कागद कोठें आहेत वामनराव.

**वामनराव**—हे हजर आहेत. ( पुढें आणितो. )

**गुण्डोपंत**—लिहा कीं, येथें जमलेल्या मंडळीनें मागें

झालेल्या विधवा विवाहा संबंधीं वादाचे पुनरालोचन केलें. त्यांत हल्लींच्या स्थिती वरून, हिंदुधर्म शास्त्राचे रहस्याव-रून, व आपले समाजांत व इतर स्थळीं आलेल्या अनु-भवा वरून प्रौढ अगर बाल विधवा विवाह करणें सर्व संमत आहे असें ठरलें आहे. हा मजकूर सर्व ठिकाणीं कळविण्या विषयीं जमलेल्या मंडळींची आज्ञा झाल्यानें कळवीत आहें उत्तर येणें अस्सल कागदावर सह्या घेऊन नकला आज्ञेवरून ह्मणून गांवोगांवीं पाठवा.

**वामनराव**–मजकूर लिहून वाचून दाखवितो आणि सर्वांच्या सह्या घेतो.

**बाळासाहेब**–( गुंगीत सही करतांना ) शंकराज्ञेप्रमाणें विजया घेणें फार हितकारक आहे. (सर्वमंडळी बरोबर जातात.)

---

## प्रवेश ३ रा.

**स्थळ–चंद्रशेखराचें घर व दिवाणखाना.**

**( चंद्रशेखर बसलेला आहे, बाहेर परिचारक उभा आहे. )**

**परिचारक**–महाराजांकडे जांबुवंत राव येत आहेत.

**चंद्रशेखर**- येऊं दे. बरें झालें, मलाही त्यास भेटण्याचें होतेंच.

**जाबुवंतराव**–( परिचारकास ) कसे काय स्वारी काय करते आहे मी आलो आहे कळिवलेस का?

**परिचारक**–जी, होय. आपण जावें आंत.

**जांबुवंतराव**–( नमस्कार करून बसतो. ) लग्नाची तर व्यवस्था सोळा आणे झाली. नांव ठेवण्यास कोणासच जागा नाहीं, परंतु हा शास्त्रार्थ कसा इतका अनुकूल मिळाला याचें कांहीं मर्म कळत नाहीं. पहातों तों रामभटांचा आग्रहही उलट बाजूचा नाहीं, शास्त्री मंडळी व भिक्षुक याणींही उलट बाजू सोडिली, सरदार तर अगदीं गुंगींत होते, त्यांना काय चाललें आहे आणि काय नाहीं हे मुळींच ठाऊक नाहीं. पेन्शनरांचा तर गांवांत इतका बोभाट कीं त्यानीं येथें परत देखील कांहीं दिवस येण्यास नको. स्वामी अध्यक्ष तर पूर्ण अनुकूल. हा योग कांहीं विलक्षणच आला, किंवा आपलें उभयतांचें सुभाग्य ह्मणावें, परमेश्वर कृपा सत्पात्री कधीं कधीं होत असते त्यांतीलच हा दाखला समजावा.

**चंद्रशेखर**–सुभाग्य आणि कृपा हीं तर खरींच, परंतु मुख्य यत्न माझा मित्र गुंडोपंत याचा. त्याचे मजवर किती उपकार ह्मणून सांगू. माझें मन माझी पहिली बायको निवर्तल्यापासून उद्विग्न झालें होतें, तें पुनः संसाराभिमुख करविलें कसें ह्मणशील तर एक.

## पद

प्रथम पतिच्या मरणानें मम प्रिया बुडाली होती ।
दुःखा माजी त्यांतुनि तिजला काढावी वरती ।
ऐसी मित्रा गुंडोपंता प्रथम बुद्धि जहाली ।
त्यानें मजसी युक्तिने तिस वारंवार दाविली ।
पाहुनि तीचें दिव्य रूप मी मोहित बहु जहालों ।
मित्रालागि तिची हकीकत विचारूनि पावलों ।
खेदा बहुत मी माझे हृदयीं निश्चय दृढ केला ।
वरण्याचा तिस परि विनयानें प्रश्न न तिस पुसला ।
जेव्हां गेली प्रिया पति गृहीं मन झुरणी लागलें ।
मित्राचि संमति घेउनि पत्र त्विरा पाठविलें ।
त्याचें उत्तर मना जोगतें लवकर मज आलें ।
मित्रा लागी नेउनि झटकारि मीतें दाखविलें ।

चाल दुसरी—( ममरामी रंगलें इ. )

या नंतर जी मित्रानें खटपट केली ती ऐक—

विवाह कार्यी विघ्नें जरि बहु आह्मासी दिसली ।
मित्राच्या यत्नानें सगळीं तीं निरस्त जहालीं ।
पेन्शनराची दुष्कृति अवघ्या लोकाना कळली ।
सरदाराची मति भंग प्राशनी गुंग जहाली ।
रामभटजी कन्या विक्रय दोषामधि आंपडले ।
भट भिक्षुकजन इतर मंडळी दानें तृप्त जहाली ।
मित्राच्या यत्मानें अवघी विघ्नें निरस्त जाली ।

स्वामीचें येणें मात्र प्रियेच्या अनुग्रहानें झालें. त्यांची तिची भेट इकडे येतांना पडली त्याणीं हकीकत समजून

आपण इकडे येऊं ह्मणून सांगितलें होतें. तेथील एका मासे धरणाऱ्या मुलानें येथें येऊन वेळेवर बातमी त्यांस देऊन येथें आणिलें. स्वामींची योग्यता सर्वांस श्रुत असल्यावरून त्यांनीं अध्यक्ष स्थान स्वीकारिलें, याप्रमाणें या सर्व कार्याचा शेवट जहाला. आतां प्रियेच्या मनांत आपल्या माहेरच्या व पहिल्या सासरच्या मंडळीस भेटावें असें आहे त्याकरितां मी त्यांस येथें बोलावणें केलें आहे.

**जांबुवंतराव**—वाः फार उत्तम. लग्नांतल्या मेजवान्यांची पुनरावृत्तीच व्हावयाची आहे ह्मणावयाची. ( पोटाला हात लावून ) हल्लीं कांहीं जागा राहिलेली नाहीं, परंतु एक दोन दिवसांनंतर ताव मारण्यास कांहीं हरकत नाहीं.

( सगुणाबाई व नारायण प्रवेश करितात. )

**सगुणाबाई**—मी आपल्या विषयीं ऐकिलें होतें पण प्रत्यक्ष आपणास पाहिले नव्हते. बरा आज योग आला. आपल्यावर इकडील फार लोभ आहे तेव्हां मलाही तसाच केला पाहिजे.

**जांबुवंतराव**—मग काय आमच्या पोटाची पुरतीच चंगळ ह्मणावयाची; पण दुहेरी लोभापुढें माझी एकेरी भूक कशी टिकणार!

**सगुणाबाई**—सकाळची भूक एक आणि संध्याकाळची दुसरी अशा दोन धरल्या ह्मणजे झाली दुहेरी.

**जांबुवंतराव**—होय, ही युक्ति बरी जमेल.

**चंद्रशेखर**—हा बघ नारायण तुझा चाकाचा घोडा.

**नारायण**—आतां बरीक चांगला झाला. मला फिर-

वायला नाहीं तर गाडीला लावायला.

**परिचारक**—आपणाकडे गुंडोपंत येत आहेत.

**चंद्रशेखर**—बरें आहे मित्राचें घरच आहे.

( गुंडोपंत प्रवेश करितो, सर्व उठून उभे रहातात,
गुंडोपंत बसतो, नंतर सर्व बसतात. )

**गुंडोपंत**—मित्रा तुला सपत्नीक पाहून मला फार बरें वाटतें काय सांगूं. पद.

पाहुनी तुह्मा दोघांस सुखानें वास करित असताना ।
होतसे बहुत संतोष भाग्ययुक्ताना ॥ १ ॥
वैधव्य असे दुःसह्य जाणिती सर्व स्त्रियांसी भारी ।
विधुरता हरी पुरुषता सौख्य संहारी ॥ २ ॥
प्रेमानुबंधनावीण पतीचे शून्य दिसे त्रिभुवन हें ।
वनितांसि तसें पुरुषांसि स्त्रियेंविण वन हें ॥ ३ ॥
जाणुनी परस्पर दुःख चालवुनि हक्क लाविलें लग्ना ।
प्रभु कृपा मनोरथ पूर्ण करूं हरुं विघ्ना ॥ ४ ॥

**सगुणाबाई**—मला या लोकीं तीन प्रकारचे पुरुष दिसतात. कसे सांगतें.

पद-राग-ललत, ताल-धमार.
( लाऽल होऽकैसे जाउं आली या चालीवर )

दिसतीऽ त्रिविध पुरुषहि मजसि । वंऽदी त्यांऽ-
तिल उत्तमासि ॥ एक जे भोगुनि निंदिति स्त्रीऽ-
सि । नामहि पुरुष न शोभे त्यासी ॥
दुसरेऽ भोगिति तोवरि प्रीतिसि । दाविति स्वार्थ
आणुनि मनासि ॥ तिसरे साधन संसारासि ।
जननी गृहिणी मैत्री पेशि ॥
अर्धांगाधिक मानिति जीसि । हेचि उत्तम समजे
दासी ॥ दिसती० ॥

असे उत्तम पुरुष जे ते स्त्रियांना देवासमान दिसतात

व त्यांचे ठिकाणीं अढळ प्रेमानें व भक्तीनें त्या राहतात.

चंद्रशेखर—पुरुषांना तर अशा स्त्रिया ह्मणजे सर्वेंद्रिय सुखैक साधनरूप दिसतात मग ते जर कामवश जहालेले दिसले तर नवल काय? पहा—

पद–राग–सोनी, ताल–झंपा.

( लाल आयेरे या चालीवर )

**सर्व इंद्रिय सुखें एकरूपें जरी मिळति तरि यांत रत कां न व्हावें। तुझ्या ठायिं रत मनसिजा का न व्हावें। पाहुनी प्रियतमेच्या मुखा लागिं अति नेत्र आनंदती जेंवि चन्द्रा। तत्स्वरा ऐकुनी कर्ण-ही तोषती जेंवि लय तालयुत मधुर गाना। पावुनी तन्मुखा स्वाद अमृतोपमा मानिती तुच्छ इतरा रसाना। अंग परिमल जिचा मलय गंधा-हुनी वाटतो अधिक चतुराजनाना। स्पर्शसुख मोक्षरूपाचि असे वर्णनाहूनि अतिरिक्त तरि का न व्हावें॥ तुझ्या०॥**

सगुणाबाई—जशी पुरुषाला स्त्री ही सर्व रसैकभूत उपभोग्य वस्तु, तसाच पुरुष हाही स्त्रीला सर्व रसैकभूत मनोहर आधार आहे. या त्यांच्या परस्पर अनुरंजनाच्या स्वाभाविक संबंधास अडथळे आणण्यास कारण फक्त दुराग्रह अगर दुष्टपणा.

परिचारक—बाईसाहेबांचे माहेरची मंडळी आली आहे.

चंद्रशेखर—बोलाव त्यांना इकडे. त्यांचेंच घर आहे ( सगुणाबाईची आई, बाप, बहीण अशीं येतात. त्यांस योग्य ठिकाणीं बसवून चंद्रशेखर व गुंडोपंत, आई व बाप यांस नमस्कार करून बसतात. सगुणाबाईही नमस्कार करून बसते. )

**परिचारक**–नानासाहेब व नारायणराव वगैरे मंडळी आली आहे.

( चंद्रशेखर व गुण्डोपंत दोघे बाहेर जाऊन त्यांस आंत घेऊन येतात व योग्य ठिकाणीं बसवितात व आपण बसतात.

**परिचारक**–महाराज नीलकंठ स्वामी आले आहेत.

( सर्व मंडळी उठून त्यांचें स्वागत करितात व सर्व मंडळी बसते. )

**नीलकंठस्वामी**–सगुणाबाई तुला माझा आशीर्वाद आहे.

पद्य–नारि असुनि धैर्य तुवां खरें दाविलें

**सगुणाबाई**–मजहुनि तें अधिक असे ( चंद्रशेखराकडे हात करून ) या जनी भलें

**नीलकंठस्वामी**–सत्कार परस्पर करुनि सौख्य साधिले

**सगुणाबाई**–उपकार अह्मांवरि अपुले बहुत जाहले.

**नीलकंठस्वामी**–( नारायणरावाकडे पाहून )

अभिनंदन नारायणराव तुमचें ।
करितो हा बंधु विष्णुनाम जयाचें ॥

**नारायणराव**–( आश्चर्ययुक्त होऊन स्वामीस ओळखून पायां पडून )

धन्य दिवस आज मला बंधु दर्शनें ।
पूर्ण मनोरथ जहाले कांहीं ना उणें ॥

**नीलकंठस्वामी**–आपण या कामीं कोणतीही हरकत आणिली नाहींत हें आपल्या सौजन्यास अधिक भूषणावह जहालें आहे. ( पडदा पडतो. )

**समाप्त.**